दैनिक
जनप्रभात
सामाजिक परिवर्तनाचा बुलंद आवाज

■(आष्टी) वर्धा ■बुधवार, दि.२४ जानेवारी २०२४ ■ वर्ष २ रे ■अंक १९८ ■पृष्ठ ४ ■मुल्य ५.०० ■मुख्यसंपादक : राहुल गजरे ■कार्यकारी संपादक : अवधूत शेंद्रे RNI NO : MAHAR/2020/82242

मृदा सर्वेक्षण, जमीन उपयोग नियोजनाबाबत सादरीकरण

मुंबई : महाराष्ट्रातील मृद सर्वेक्षण करुन एकत्रित माहिती संकलित करण्याच्या अनुषंगाने मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली. बैठकीमध्ये जमीन उपयोग नियोजन संस्थेने (छीं) माती परिक्षणाबाबत संस्थेचे संचालक नितीन पाटील यांनी सादरीकरण केले.मंत्री श्री. राठोड यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या दालनात झालेल्या बैठकीस मृद व जलसंधारण विभागाचे सहसचिव सु. म. काळे, कृषी विभागाचे सहसचिव गणेश पाटील, फलोत्पादन विभागाचे संचालक डॉ. के. पी. मोत्रे, मृद व जलसंधारण विभागाच्या अवर सचिव शुभांगी पोटे, मृद व जलसंधारणचे सहसंचालक पांडुरंग शेळके, कृषी उपसंचालक शरद सोनवणे उपस्थित होते.कृषी विकास दर वाढवण्यास मातीची गुणवत्ता व पोषकता महत्त्वाची असून यासाठी मृदा सर्वेक्षण करणे गरजेचे आहे. मृदा सर्वेक्षण आणि जमीन उपयोग नियोजन याबाबत सर्वंकष आढावा घेण्यासाठी सर्व संबधित विभागांच्या मुख्य सचिवांच्या प्रमुख उपस्थितीत बैठकीचे आयोजन करावे, अशा सूचना मृद व जलसंधारण मंत्री श्री. राठोड यांनी दिल्या.बैठकीत राष्ट्रीय मृद सर्वेक्षण आणि जमीन उपयोग नियोजन संस्थेचे (छीं) संचालक नितीन पाटील यांनी याबाबतचे सादरीकरण केले.

मधमाशांमुळे पीक उत्पादनात ५ ते ४० टक्क्के होते वाढः डॉ. सी. एस. पाटील

वृत्तसंस्था ■ मुंबई



आहारातील एक तृतीयांश भाग हा पिकांच्या परागीभवनाद्वारे मिळत असतो. मधमाशांमुळे होणाऱ्या परागीभवनाद्वारे पीक उत्पादनात ५ ते ४० टक्के वाढ होते. त्यामुळे मधमाशांबद्दल जागरुकता निर्माण करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन राहुरी कृषी विद्यापीठातील कीटकशास्त्र विभागप्रमुख डॉ. सी. एस. पाटील यांनी केले.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे आयोजित मध महोत्सवातील 'शेती व मधमाशापालन या विषयावरील परिसंवादात अध्यक्ष म्हणून ते बोलत होते. यात सातारा जिल्ह्यातील बोरगाव येथील स्वाती गुरवे ठाणे जिल्ह्यातील कृषी विज्ञान केंद्र कोसवाड येथील उत्तम सहाणे सहभागी झाले होते.

डॉ.पाटील म्हणाले की, आहारातील एक तृतीयांश भाग परागीभवनाद्वारे मिळतो. परागीभवनाची प्रक्रिया होण्यासाठी राज्यात नैसर्गिक आणि भौगोलिक परिस्थिती पूरक आहे. मधमाशांद्वारे होणाऱ्या परागीभवनामुळे ५ ते ४० टक्क्यांपर्यंत पीक उत्पादनात वाढ झाली आहे. उत्पादनांची गुणवत्ता राखून उत्पन्न अधिक पौष्टिक होते, असेही संशोधनात पुढे आले आहे. कीडनाशकांचा अतिरेकी वापर मधमाशांसाठी घातक ठरत आहे. पण त्याशिवाय मधामध्ये कीडनाशकांचा अंश आढळून येत आहे हे जास्त धोकादायक आहे. किडनाशक मंडळाने ३२९ किडनाशके प्रमाणित केली आहेत. तीच शेतकऱ्यांनी वापरावीत. कीडनाशकांमुळे मधमाशा नष्ट होत आहेत. त्यांना वाचवायचे असेल, तर कीडनाशकांचा कमी वापर करून सेंद्रिय शेतीकडे वळावे असेही श्री. पाटील म्हणाले.

यावेळी बोलताना श्रीमती गुरवे यांनी विविध फळे, भाज्या, धान्य, तेलबिया आणि इतर पिकांमध्ये परागीभवनाची प्रक्रिया होते. निसर्गाचा जैविक समतोल साधण्याची किमया परागीभवनात असते. यात सर्वात जास्त हातभार हा मधमाशांचा लागतो. तसेच पिकांना कीटकांपासून वाचविण्यातही मदत होत असते. मधमाशांमुळे परागीभवन झाल्यामुळे पीक उत्पादनात वाढ होणारी पिके आहेत. तेलवर्गीय मोहरीत ४३ टक्के, सूर्यफुलात ३२ ते ४८ टक्के, करडईत २८ टक्के, तीळ २२ ते ३७, सोयाबीन १९ टक्के, एरंडी ३०, जवस १७ ते ४०, नायगर २२ टक्के उत्पादन वाढ झाल्याचे अभ्यासाअंती सिद्ध झाले आहे. मधमाशांमुळे मिळणारे मध हे सर्वात पौष्टिक अन्न मानले जाते. डोळ्यासाठी हितकारक, स्वरामध्ये सुधारणा, बुद्धीधारणक्षमता वाढविणारा म्हणून मधाची ओळख आहे. खोकला, पित्त, कफ, क्षय, कर्करोग, मधुमेह, हृदयरोग, मळमळ यावर मध गुणकारी आहे. तसेच भूक वाढविण्यासाठीही तो उपयुक्त आहे. मधमाशांच्या संवर्धनासाठी आपण फुले देणाऱ्या झाडांची लागवड करण्याबरोबरच सेंद्रीय शेतीला प्राधान्य दिले पाहिजे. मधमाशांना आकर्षित कराणाऱ्या पिकांची लागवड करून शेतात किमान एक तरी मधमाशी वसाहत असावी अशी व्यवस्था केली पाहिजे. कीटकनाशके, बुरशीनाशके आणि तणनाशकांचा कमीत कमी वापर केला पाहिजे. शेतात असलेल्या मधमाशींच्या पोळ्याचे संगोपन केले पाहिजे. तसेच प्रतिकूल हवामान असल्यास मधमाशी पेट्यांची काळजी घेण्याची गरज आहे, असेही त्या म्हणाल्या.

श्री. सहाणे यांनी मधमाशी अर्धा ते एक किलोमीटर भागात फिरून एक पोळी तयार करते हे सांगतांना फुलोरी मधमाशी हे परागीभवणासाठी अत्यंत उपयुक्त आहे, असे सांगितले. मधमाशीचे एक पोळे नष्ट करणे म्हणजे त्या शेत शिवारातील उभे पिक नष्ट करण्यासारखे आहे. तसेच आग्या पोळ्यामध्ये पन्नास हजार ते एक लाख मधमाशा असतात. जाळ करून किंवा धूर करून माशा उडवल्या आणि मध काढला तर जवळपास २५ एकर मधील जंगल नष्ट होते. त्यामुळे मध काढण्याची शास्त्रीय पद्धत अवलंबवावी. मधाच्या पोळ्यामध्ये मध असलेला भाग फुगीर होतो. तेवढा भाग वेगळा काढून आपण मधमाशीचे पोळे वाचवू शकतो. पुन्हा ते पोळे पूर्ववत लावल्यास बाहेर गेलेल्या माशा त्यावर परत येतात, असेही श्री ससाणे यांनी सादरीकरणाद्वारे सांगितले.

मधमाशांच्या मुख्य जाती

आग्या माशी आणि फुलोरी माशी या दोन माशांच्या जाती जंगली मधमाशा आहेत, तर सातेरी, मेलीफेरा आणि ट्रायगोना कोती या पेटीत पाळता येणाऱ्या मधमाशा आहेत, असेही डॉ. सहाणे यांनी सांगितले. फुलोरी मधमाशी पेटीत घेण्याचे मुख्य कारण म्हणजे ही स्थानिक मधमाशी आहे. ती स्थानिक हवामानाशी जुळलेली असते. स्थानिक पिकांच्या फुलांवर खूप मोठ्या प्रमाणात तिचा आढळ आहे तसेच तिचा परागीभवनाच्या प्रक्रियेत मोठा वाटा आहे, असेही त्यांनी सांगितले.

शिवसेनाप्रमुख हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांना जयंतीदिनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून अभिवादन



वृत्तसंस्था ■ मुंबई

शिवसेनाप्रमुख हिंदुहृदयसम्राट वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज वर्षा निवासस्थान, विधानभवन, रिगल सिनेमा चौकातील बाळासाहेबांचा पुर्णाकृती पुतळा, बाळासाहेब भवन याठिकाणी विनम्र अभिवादन केले.

वर्षा शासकीय निवासस्थानी मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी नेताजी सुभाषचंद्र बोस, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केल्यानंतर विधानभवनातील एका कार्यक्रमात मुख्यमंत्र्यांनी बाळासाहेबांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करीत अभिवादन केले. यावेळी विधानसभा अध्यक्ष ॲड.राहुल नार्वेकर, विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, मदत व पुनर्वसन मंत्री अनिल पाटील, आमदार मनीषा कायंदे, रईस शेख, अमोल मिटकरी आदी उपस्थित होते.

मंत्रालयासमोरील बाळासाहेब भवनाला भेट देऊन मुख्यमंत्र्यांनी शिवसेनाप्रमुखांना जयंती दिनी अभिवादन केले. त्यानंतर कुलाबा येथील रिगल सिनेमा चौकातील बाळासाहेबांच्या पुर्णाकृती पुतळ्याला मुख्यमंत्र्यांनी पुष्पहार अर्पण करीत अभिवादन केले.

आर्वी तहसील पुरवठा विभाग आर्वी येथे राशन कार्ड बनवण्यासाठी दलालांचा सुळसुळाट

☆पुरवठा निरीक्षक सीमा महल्ले यांच्या पोसनीचे आर्वी पुरवठा विभागात दलाल ☆देवेंद्र चोरे नामक दलाल घेतोय एका कार्डचे तीन हजार रुपये ☆दलाला शिवाय कार्ड लागते चार ते सहा महिने ☆भ्रष्टाचाराने पोखरलेल्या पुरवठा निरीक्षक यांच्या कार्यकाळात कित्येक कार्ड धारकांचे फाईल धुळखात ☆महल्ले मॅडम लक्ष्मीला सोबत घेतल्याशिवाय काम करत नाही असे तहसील परिसरात दबके आवाजात चर्चा

आर्वी ■ प्रतिनिधी

आर्वी पुरवठा विभागातील पुरवठा निरीक्षक यांच्या भ्रष्टाचाराचा पाढा वाढत जात असून दैनिक जनप्रभातच्या हाती तांदूळ प्रकरण, मोरेश्वर जयसिंगपूरे आत्महत्या प्रकरण, राहुल वावरे प्रकरण आणि आता राशन कार्ड बनविणाऱ्या दलालांचा सुळसुळाट या प्रकरणाने मॅडम सदैव चर्चेत असून जणू काही त्यांच्या या प्रकरणाला पाहून प्रशासनाने त्यांना बढती देण्याचे ठरविले असे हास्यमय चर्चा तहसील कार्यालय परिसरात वाढत आहे. काही लोकांकडून दबक्या आवाजात बोलले जात आहे की महसूल विभागाचा नवीन फंडा भ्रष्टाचार करा आणि बढती घ्या.

सविस्तर वृत्त असे की पुरवठा निरीक्षक अधिकारी सीमा महल्ले यांनी राशन कार्ड



पुरवठा निरीक्षक सीमा महल्ले



पुरवठा विभागातील दलाल देवेंद्र चोरे

बनवण्याकरिता दलाल पोसणीला ठेवले असल्याने तसेच त्यांचा नियमित दलाल देवेंद्र चोरे हा असून तो प्रती राशन कार्ड करीता ३००० रुपये घेत आहे. जो तीन हजार रुपये देईल त्याचे राशन कार्ड ताक्काळ मॅडम करतात असे दलाल बोलत असल्याची चर्चा नागरिकात आहे. तर दलाला शिवाय सामान्य माणसाला रेशन कार्ड करिता चार ते सहा महिने कालावधी लागत असल्याने भ्रष्टाचाराने पोखरलेल्या पुरवठा निरीक्षक यांना सामान्य कडून केविलवाना सारखा प्रयत्न केला जातो परंतु मॅडमला घाम फुटत नाही असे राशन कार्ड धारकाकडून बोलले जात आहे. तर मॅडम च्या कार्यकाळात कित्येक फाईल धुळखात पडल्या असून मॅडम चे तत्व फक्त एवढेच लक्ष्मी सोबत घेतल्याशिवाय मॅडमचा पेन चालत नाही अशी दबक्या आवाजात तहसील परिसरात चर्चा आहे.

क्रमश :

जिल्हाधिकाऱ्यांची राजकीय पक्षाच्या प्रतिनिधींसोबत बैठक

वर्धा ■ प्रतिनिधी



जिल्ह्याची अंतिम मतदार यादी प्रसिद्ध;राजकीय पक्षांनी सहकार्य करण्याचे आवाहन

आगामी काळात लोकसभा व विधानसभेची निवडणूक होणार आहे. लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी राजकीय पक्षांची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. मतदार यादी विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत अंतिम मतदार यादी प्रसिध्द करण्यात आली असून राजकीय पक्षांनी आपल्या माध्यमातून नागरिकांना मोठ्या प्रमाणात मतदान प्रक्रियेत सहभागी करण्यासाठी प्रयत्न करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी राहुल कर्डिले यांनी केले.

अंतीम मतदार यादी प्रसिध्दीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयात राजकीय पक्षांची बैठक आयोजित करण्यात आली होती, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी उपजिल्हा निवडणूक अधिकारी अनिल गावित, आर्वीचे उपविभागीय अधिकारी विश्वास शिरसाट, नायब तहसीलदार अतुल रायपायले तसेच विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते. त्यात यशवंत झाडे, राज खेलकर, प्रवीण चौरे, प्रा.खलील खतीब, अविनाश भांडे, रविंद्र सौरंगपते, अविनाश सेलुकर, प्रमोद भोमले यांचा समावेश आहे.

दि.२३ जानेवारी रोजी अंतीम मतदार यादी प्रसिध्द झाली असून मतदारांनी आपले नाव तपासून घ्यावे. अंतीम मतदार यादीनुसार जिल्ह्यात १० लाख ८१ हजार ५१२ एकूण मतदार असून त्यामध्ये स्त्री मतदारांची संख्या ५ लाख ३० हजार ६२० तर ५ लाख ५० हजार ८८३ पुरुष मतदार असून ९ इतर मतदार आहेत. आर्वी विधानसभा मतदार संघामध्ये २ लाख ५६ हजार १४२, देवळी विधानसभा मतदार संघामध्ये २ लाख ६२ हजार ९४४, हिंगणघाट विधानसभा मतदार संघामध्ये २ लाख ८७ हजार ६९१ व वर्धा विधानसभा मतदार संघामध्ये २ लाख ७४ हजार ७२५ मतदार आहेत.

अंतीम मतदार यादी मध्ये ३६ हजार ३९५ मतदार समाविष्ट झाले तर ३७ हजार ९६६ मतदारांची नावे कमी करण्यात आली आहे. जिल्ह्यात एकूण ८ हजार ११ दिव्यांग मतदारांची नोंदणी झाली आहे. ८८५ सेनादलातील एकूण मतदार आहेत. तसेच जिल्ह्यात १ हजार ३०० एकूण मतदान केंद्र आहेत, असे जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी सांगितले.

मतदार यादी अधिक सुदृढ करण्यासाठी प्रारुप मतदार यादी प्रसिध्द झाल्यानंतर विशेष ग्रामसभांचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये मतदार यादीचे वाचन करण्यात आले असून मृत, स्थलांतरित व कायम स्थलांतरित मतदारांची नोंद घेऊन नावे वगळण्यात आली. भटक्या विमुक्त जमातींच्या मतदारांची नोंदणी करण्यासाठी विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये ५४२ नव मतदारांची नोंदणी करण्यात आली असल्याचे ते म्हणाले.

पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत नव मतदार नोंदणी करणे, मतदार यादीतील नावे तपासणे, वगळणे, दुरुस्ती, आधार जोडणी करुन घेणे याकरीता दि.४, ५, २५ व २६ नोव्हेंबर रोजी आर्वी, देवळी, हिंगणघाट व वर्धा या चारही विधानसभा क्षेत्रातील मतदान केंद्रावर विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. तसेच विविध संघटनाचे मेळावे, मोबाईल डेमो व्हॅनव्दारे जनजागृती तसेच ईव्हीएम, व्हीव्हीपॅट बाबत जनजागृती करण्यात आली.

केंद्र शासनाच्या विविध योजनांचा लाभ घ्या - सम्राट राही



वर्धा ■ प्रतिनिधी

गवंडी येथे विकसित भारत संकल्प यात्रा लाभार्थ्यांशी संवाद, प्रमाणपत्रांचे वितरण

विकसित भारत संकल्प यात्रा अंतर्गत कारंजा तालुक्यातील ग्रामपंचायत गवंडी येथे यात्रा मोहिमेचे जिल्हा प्रभारी सम्राट राही (आयआरएस) यांनी भेट देऊन नागरिक व लाभार्थ्यांशी संवाद साधला. केंद्र शासन विविध प्रकारच्या योजना राबविते, त्याचा लाभ घेण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

कार्यक्रमास श्री.राही यांच्यासह तहसीलदार ऐश्वर्या गिरी, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष सरिता गाखरे, गटविकास अधिकारी प्रवीण देशमुख, तालुका कृषी अधिकारी श्री.देशमुख व इतर विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

केंद्र शासनाच्या वतीने विविध ३४ प्रकाच्या फ्लॅगशिप योजना राबविण्यात येत आहे. या योजनांच्या लाभापासून अद्यापही वंचित असलेल्या पात्र लाभार्थ्यांना लाभ मिळवून देण्यासाठी विकसित भारत संकल्प यात्रा ही मोहीम राबवली जात आहे. या मोहिमेंतर्गत प्रत्येक गावात चित्ररथाद्वारे जनजागृती व विविध शिबिरांचे आयोजन करुन पात्र व्यक्तीस योजनांचा लाभ मिळवून दिला जात आहे.

गवंडी येथे आयोजित या कार्यक्रमात यात्रा मोहिमेचे जिल्हा नोडल अधिकारी सम्राट राही यांनी सहभाग घेतला. कार्यक्रमात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गवंडी येथील विद्यार्थ्यांनी स्वच्छ भारत मिशन अंतर्गत स्वच्छतेवर पथनाट्य सादर करून 'धरती कहे पुकार के' या कार्यक्रमाचे सादरीकरण केले. यावेळी विविध योजनेचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांनी 'मेरी कहानी, मेरी जुबानी' अंतर्गत मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमात श्री.राही यांच्याहस्ते मंजुरी पत्र, प्रशस्तीपत्र व सन्मान पत्राचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन पंचायत समितीचे विस्तार अधिकारी कैलास वानखेडे यांनी केले. यावेळी गावकरी, लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यात्रेनिमित्त विविध विभागाच्यावतीने स्टॉल लावण्यात आले होते.

शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारां'च्या यादीतून वगळलेल्या सात खेळांचा पुन्हा समावेश करण्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निर्देश

वृत्तसंस्था ■ नवी मुंबई



शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्काराकरिता पात्र क्रीडा प्रकारांच्या यादीतून वगळण्यात आलेल्या गोल्फ, पॉवरलिफ्टिंग, बॉडीबिल्डिंग, कॅरम, बिलियर्डस ॲण्ड स्नूकर, यॉटिंग आणि इक्वेस्टेरियन या सात क्रीडा प्रकारांना पुन्हा शिवछत्रपती पुरस्कारासाठी पात्र ठरवण्यात यावे. तसेच जिम्नॅस्टिकमधील उपप्रकार असलेल्या एरोबिक्स व ?क्रोबॅटिक्स या क्रीडा प्रकारांचा शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारांच्या यादीत नव्याने सामावेश करावा, असे निर्देश उपमुख्यमंत्री तथा महाराष्ट्र ऑलिंम्पिक असोसिएशनचे अध्यक्ष अजित पवार यांनी आज मंत्रालयात आयोजित बैठकीत दिले. यंदाच्या (सन २०२२-२०२३) पुरस्कारांसाठी फेरसमाविष्ट केलेल्या क्रीडा प्रकारातील अर्ज ऑनलाईन पध्दतीने तातडीने मागवून तेही विचारात घ्यावेत, अशा सूचनाही उपमुख्यमंत्र्यांनी दिल्या.

राज्य शासनाने अलिकडे जारी केलेल्या सुधारित शासन निर्णयात, गोल्फ, पॉवरलिफ्टिंग, बॉडीबिल्डिंग, कॅरम, बिलियर्डस ?ण्ड स्नूकर, यॉटिंग आणि इक्वेस्टेरियन या सात क्रीडाप्रकारांना वगळण्यात आले होते. शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारांसाठी पात्र क्रीडा प्रकारांच्या यादीतून वगळण्यात आलेल्या खेळांच्या संघटनांनी त्यांच्यावर झालेला अन्याय दूर करण्याबाबत तसेच त्यांच्या खेळांचा शिवछत्रपती क्रीडा पुरस्कारासाठी पात्र क्रीडाप्रकारांमध्ये समावेश करण्याबाबत क्रीडा संचालनालयास पत्रव्यवहार केला होता, त्या अनुषंगाने उपमुख्यमंत्री तथा महाराष्ट्र ऑलिंम्पिक असोसिएशनचे अध्यक्ष श्री.पवार यांच्या अध्यक्षतेखाली आज मंत्रालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीला क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे, उद्योग मंत्री उदय सामंत, क्रीडा विभागाचे अपर मुख्य सचिव ओमप्रकाश गुप्ता, दूरदृश्यसंवाद प्रणालीद्वारे क्रीडा विभागाचे आयुक्त सुहास दिवसे, महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेचे उपाध्यक्ष संजय शेटे, महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेचे महासचिव नामदेव शिरगावकर (दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे), अरुण केदार, अजित सावंत (कॅरम), संजय सरदेसाई, संजय माधव (पॉवर लिफ्टिंग), महेंद्र चेंबूरकर (जिम्नॅस्टिक्स), देवेंद्र जोशी, क्षितिज वेदक (बिलियर्ड्स आणि स्नूकर), विजय झगडे, राजेश सावंत (बॉडीबिल्डिंग), विठ्ठल शिरगावकर (मॉडर्न नेन्थोलॉन) आदी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले की, कोणताही खेळाडू तो खेळत असलेल्या क्रीडा प्रकारात यश मिळविण्यासाठी त्याची उमेदीची वर्षे खर्च करतो. आपले सर्वस्व पणाला लावतो. आपल्या कौशल्य, मेहनतीच्या बळावर राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर राज्यासह देशाचे नाव उज्ज्वल करतो. अशा खेळाडूंच्या क्रीडा कामगिरीचा गौरव करण्यासाठी राज्य सरकारच्या वतीने शिवछत्रपती पुरस्कार देण्यात येतात. त्यामुळे कुठल्याही खेळावर आणि खेळाडूंवर अन्याय होऊन चालणार नाही.

शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारासाठी पात्र असलेल्या ४४ खेळांपैकी, वगळण्यात आलेल्या इक्वेस्टेरियन, गोल्फ, पॉवर लिफ्टिंग, बॉडीबिल्डिंग, कॅरम, बिलियर्डस ?ण्ड स्नूकर, यॉटिंग या सात खेळांना पुन्हा यादीत सामावून घेण्याचा निर्णय उपमुख्यमंत्री श्री. पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत घेण्यात आला. जिम्नॅस्टिक खेळामधील उपप्रकार असणाऱ्या एरोबिक्स व ?क्रोबॅटिक्स या क्रीडा प्रकारांचा शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारांच्या पात्र यादीत नव्याने समावेश करण्याचे ठरविण्यात आले. सन २०२२-२३ या वर्षातील शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारासाठी क्रीडा विभागाच्या संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज मागविण्यात आले होते. त्यांची मुदत २२ जानेवारीपर्यंतच होती. ही मुदत वाढवून या नव्याने समाविष्ट केलेल्या खेळांसाठीचे अर्ज ऑनलाईन मागविण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी दिल्या.

संपादकीय...

ताळेबंदांचा तोल!...

कंपन्यांच्या आर्थिक लेखाजोख्यात वाढ होते आहे खरी, पण ही वाढ गेल्या ४२ महिन्यांतील सर्वात मंद असणे हे अर्थव्यवस्था मंदावल्याचे लक्षण. सध्याच्या उत्सवी आणि उत्साही वातावरणाचा आनंद घेत असतानाही एका तपशिलाकडे दुर्लक्ष करणे शहाण्यांस अवघड जाईल. हा तपशील म्हणजे गेल्या काही दिवसांत जाहीर झालेले जवळपास २०० कंपन्यांचे यंदाच्या आर्थिक वर्षातील तिसऱ्या तिमाहीचे ताळेबंद. आपल्याकडील नियमानुसार भांडवली बाजारात सूचिबद्ध कंपन्यांस दर तीन महिन्यांनी बाजारपेठ नियंत्रकास, म्हणजे 'सेबी'स (सिक्युरिटीज ?ण्ड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया), सरत्या तीन महिन्यांचा ताळेबंद सादर करावा लागतो. उत्पन्न, खर्च, देणे आणि येणे इत्यादी किमान तपशील त्यात असतो आणि तो सनदी लेखापालाने मंजूर केलेला असेलच असे नाही. तिमाहीच्या अखेरच्या दिवसानंतर ४५ दिवसांच्या आत असे ताळेबंद सादर करणे सूचिबद्ध कंपन्यांस बंधनकारक असते. या अशा तिमाही ताळेबंदात त्याची तुलना त्याआधीच्या तिमाहीशी, गेल्या वर्षातील कामगिरीशी केली जाते. आपले आर्थिक वर्ष १ एप्रिल या दिवशी सुरू होते. त्यामुळे ३० जून, ३० सप्टेंबर, ३१ डिसेंबर आणि ३१ मार्च या दिवशी अनुक्रमे पहिली, दुसरी, तिसरी आणि अखेरची तिमाही संपते. शेवटच्या तिमाहीनंतर, म्हणजे ३१ मार्चनंतर, प्रसृत होणाऱ्या ताळेबंदात कंपन्यांच्या वार्षिक कामगिरीचाही तपशील असतो. आता जे ताळेबंद 'सेबी'कडे सादर झाले ते ३१ डिसेंबर २०२३ या दिवशी संपलेल्या तिमाहीसाठीचे आहेत. ही तिसरी तिमाही. यानंतरच्या तिमाहीच्या अखेरीस २०२४ हे आर्थिक वर्ष संपेल. याचा अर्थ या आर्थिक वर्षात आता एकच तिमाही ताळेबंद उरला असून कंपन्यांस आपल्या आर्थिक आरोग्यात जी काही सुधारणा करावयाची असेल ती करण्यास जेमतेम तीन महिन्यांचा अवधी उरलेला आहे. या अशा सुधारणेची गरज आणि अपेक्षा या कंपन्यांस असेलच असेल. कारण ताज्या तिमाही निकालातून या कंपन्यांचे आर्थिक आरोग्य किती तोळामासा आहे, हे दिसून येते. शुद्ध आर्थिक निकषांवर पाहू गेल्यास जाहीर झालेल्या निकालांतून सरळ सरळ अर्थव्यवस्था मंदावल्याचा निष्कर्ष निघतो. तो काहींस कटू वाटेल. पण त्यास इलाज नाही. या जवळपास २०० कंपन्यांनी गतवर्षीय तिसऱ्या तिमाहीच्या तुलनेत १२.५ टक्के इतका नफा मिळवल्याचे या जाहीर निकालांतून दिसते. वरवर पाहू गेल्यास १२ टक्क्यांहून अधिक नफा हे अनेकांस मोठ्या प्रगतीचे चिन्ह भासेलही. पण भासच तो. याचे कारण असे की ही वाढीची गती गेल्या तब्बल १४ तिमाहींतील नीचांक ठरते. म्हणजे आपल्या कंपन्या इतक्या वा यापेक्षा अधिक कूर्म गतीने वाढल्याचे गेले ४२ महिन्यांत एकही उदाहरण नाही. यातील अनेक कंपन्यांसाठी ही कामगिरी २०२० सालच्या डिसेंबरात होती तितकी वाईट आहे. याचा अर्थ करोनाने ग्रासलेल्या अर्थव्यवस्थेची आठवण करून देईल इतकी पडझड सध्या आर्थिक क्षेत्रात दिसून येते. यातही काळजी वाटावी अशी बाब म्हणजे बँका, वित्त सेवा, विमा आणि भांडवली बाजारातील दलाल यातून वगळल्यास अन्य क्षेत्रांतील कंपन्यांची वित्तस्थिती यापेक्षाही वाईट आहे. 'बिझनेस स्टँडर्ड' वृत्तपत्राने सादर केलेल्या तौलनिक मांडणीनुसार ही चार क्षेत्रे वगळता अन्य क्षेत्रीय कंपन्यांच्या नफ्यात जेमतेम ७.८ टक्के इतकीच वाढ झाली. ही या क्षेत्रातील कंपन्यांची सर्वात मंद वाढ.याचा अर्थ या कंपन्यांच्या ताळेबंदात वाढ होत नाही; असे नाही. ही वाढ अत्यंत मंद आहे, हा यातील चिंतेचा मुद्दा. बँका, वित्त कंपन्या, वित्त सेवा, विमा वगैरे क्षेत्रे वगळली तर अन्य क्षेत्रांच्या होकायंत्रांची प्रगतीनिदर्शक सुई फार मंद गतीने हलत असल्याचा हा पुरावा. बरे, या दोनशे कंपन्या काही छोट्यामोठ्या आहेत असे नाही. तर अगदी रिलायन्स, टीसीएस, हिंदुस्तान युनिलिव्हर, इन्फोसिस आदी अशा अनेक बड्यांचा त्यात समावेश आहे. यात विशेष चिंता वाटावी अशी परिस्थिती आहे ती माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपन्यांची. या क्षेत्रांतील कंपन्यांचा या एकूण कंपन्यांतील वाटा २७ टक्के इतका आहे आणि या कंपन्यांच्या नफ्यातील वाढ जेमतेम ३.४ टक्के इतकीच आहे. गेल्या १८ महिन्यांत इतकी मंद वाढ या कंपन्यांनी कधीही अनुभवलेली नाही. त्यातही ग्राहकोपयोगी वस्तूंच्या निर्मिती कंपन्यांची परिस्थिती यात सगळ्यात तोळामासा म्हणावी अशी. ग्रामीण आणि निमशहरी भागांत या कंपन्यांची मागणी अगदीच यथातथा असल्याचे दिसते. भारतीय ग्राहक बाजारपेठेचे होकायंत्र म्हणजे हिंदुस्तान युनिलिव्हर ही कंपनी. या कंपनीच्या उत्पादन विक्रीत ताज्या तिमाहीत जेमतेम दोन टक्के इतकीच वाढ झाली. कंपनीची महसूलवृद्धी त्यामुळे मागील पानावरून पुढे चालू अशा प्रकारची असून तीत बदलाची तूर्त तरी चिन्हे नाहीत. वास्तविक गेली तिमाही खरे तर सणासुदीची. नवरात्र, दिवाळी ते नाताळ असे सर्वधर्मीय उत्साही सण या तिमाहीतील. या सणासुदींस घरात रंगरंगोटीची आपली परंपरा फार जुनी. असे असूनही या तिमाहीत एशियन पेंट्सच्या व्यवसायातही ५.५ टक्क्यांची वृद्धी झाली. महादुकानांत (मॉल्स) या काळात गर्दी दुथडी भरून होती. पण खरेदी तितकी झाली नाही, असेही या आकडेवारीतून दिसून येते. फ्रिज, टीव्ही इत्यादी वस्तूंची खरेदी या काळात अधिक होते. ती या वेळी नाही.हाच हंगाम विद्यापीठे, शैक्षणिक संस्था, अभियांत्रिकी महाविद्यालयांच्या आवारात कंपन्यांनी जाऊन थेट नोकरभरती करण्याचा. 'कॅम्पस इंटरव्ह्यू' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या नोकरभरतीकडे विद्यार्थी मोठ्या संख्येने डोळे लावून असतात. पण यंदा या शैक्षणिक 'आवार मुलाखतींत' उत्साहाचा अभाव असल्याचे स्पष्टपणे दिसते. इन्फोसिस, टीसीएस, विप्रो आदी बड्या बड्या कंपन्यांनी याआधीच या भरतीवर आपली भूमिका स्पष्ट केलेली आहे. जागतिक बाजारपेठेत मंदावलेली मागणी, आंतरराष्ट्रीय व्यापारउदीमास विविध संघर्षांमुळे मिळालेले आव्हान आणि त्याचा अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम यामुळे आर्थिक वातावरण मलूल आहे. या तीन कंपन्यांतर्फे मिळून भरल्या जाणाऱ्या जागांत यंदा जवळपास १६ हजार रोजगारांची कपात करण्यात आली आहे. परिणामी यंदा 'आवार मुलाखती'स कंपन्या तितक्या उत्साही नाहीत. तसेच ज्या तरुणांना अन्य मार्गांनी रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत त्यांचे वेतनही पूर्वीइतके आकर्षक नाही. म्हणजे कमी वेतनावर काम करण्याची वेळ या सर्वांवर आलेली आहे. याचे पडसाद महाविद्यालयीन विश्वात उमटताना दिसतात. ही परिस्थिती 'आयआयटी'सारख्या संस्थांतही आहे हे विशेष. गतसाली अत्यंत प्रतिष्ठेच्या अशा मुंबई आयआयटीत सुमारे ३५० कंपन्यांनी आवार मुलाखतीत सहभाग घेतला होता. यंदाही ही संख्या तितकीच आहे. पण या कंपन्यांकडून भरल्या जाणाऱ्या जागा मात्र कमी झाल्या आहेत. एरवी कोट्यवधी रुपयांच्या वेतनावर गुणवानांस नेमण्याची अहमहमिका या कंपन्यांत असते. यंदा ही कोट्यधीश होण्याची संधी फारच कमी जणांस मिळताना दिसते. सध्याच्या एकंदरच उत्सवी वातावरणात हे असे काही सत्य पचवणे अनेकांस तसे अवघड वाटेल. पण त्यास इलाज नाही. ताळेबंदांचा हा इशारा आहे. त्याकडे दुर्लक्ष करणे हे अंतिमतः योग्य ठरत नाही, असा इतिहास आहे. आता तोच बदलण्याची ताकद असल्याचा दावा करायचा असेल तर ठीक; पण ताळेबंदांचा तोल सांभाळण्यात शहाणपण असते.

लखनौ आकाशवाणी केंद्राचे मान्यताप्राप्त कलाकार!

पं. भीमसेन जोशी पुण्यस्मृती विशेष...



प्रसन्न होऊन गंधर्वांनी त्यांना उदारहस्ते गानविद्या दिली. त्यांच्या मैफली ऐकून मैफलीच्या गाण्याचे नियोजन कसे करावे, श्रोत्यांनुसार कोणत्या रागांची व गानप्रकारांची निवड करावी, या गोष्टी भीमसेनांनी आत्मसात केल्या. सवाई गंधर्वांच्या षष्ट्यब्दीपूर्तीच्या पुण्याच्या समारंभात सन १९४६मध्ये ते प्रथमच चमकले. महत्त्वपूर्ण अशी माहिती संतचरणरज- बापू-श्रीकृष्णदास निरंकारी यांच्या या संकलित लेखात अवश्य वाचा... संपादक.

भीमसेन जोशी हे महाराष्ट्रातील एक ख्यातकीर्त गायक व संगीतरचनाकार. त्यांचे पूर्ण नाव भीमसेन गुरुराज जोशी. त्यांचा जन्म दि.४ फेब्रुवारी १९२२ रोजी गुरुराज व रमाबाई या दांपत्यापोटी धारवाड जिल्ह्यातील रोण या त्यांच्या मावशीच्या गावी झाला. त्यांचे मूळ गाव गदगजवळचे होंबळ असून आजोबा भीमाचार्य हे गदगमध्ये स्थायिक झाले होते. ते कीर्तनकार-गायक होते. भीमसेन यांची आईही सुमधुर भजने म्हणत असे, तर वडील गुरुराज हे शिक्षक असून वेदान्तपारंगत होते. त्यांचे घराणे वंशपरंपरागत ज्योतिषी होते. बालपणापासून भीमसेन यांना गायनाचे विलक्षण आकर्षण होते. ते आईसोबत कानडी भजने म्हणत. तीव्र नैसर्गिक बुद्धिमता असूनही अभ्यासात त्यांचे मन रमले नाही. शाळेत जाता-येताना वाटेवरील ध्वनिमुद्रिकेच्या दुकानात उस्ताद अब्दुल करीमखाँ यांची झिंझोटी रागातली ठुमरीची ध्वनिमुद्रिका व सन १९३२ साली पं.सवाई गंधर्व- रामचंद्र गणेश कुंदगोळकर यांची गदगमधील मैफल यांतील किराणा घराण्याच्या दोन गायकांची गायकी ऐकून त्यांनी शास्त्रीय संगीत शिकण्याचा ध्यासच घेतला. या बालवयात किरकोळ कारणासाठी रागावून त्यांनी घर सोडले, पण काही कालावधीतच ते घरी परतले. त्यांची गाण्याची आत्यंतिक आवड पाहून वडलांनी उस्ताद इनायतखाँ यांचे गदगमधील शिष्य अगसरू चन्नाप्पा कुर्तकोटी यांच्याकडे त्यांची गाण्याची शिकवणी सुरू केली. त्यांच्याकडून वर्षभरात २०-२१ रागांशी त्यांचा प्राथमिक परिचय झाला; पण सखोल ज्ञानाची आस लागून राहिली. गुरूच्या शोधात ते घराबाहेर पडले आणि उपाशी-अर्धपोटी, रेल्वेने विनातिकीट प्रवास करत ग्वाल्हेरला हाफीज अलीखाँ- सरोदवादक अमजद अलीखाँ यांच्या वडीलांकडे पोहोचले. त्यांच्याकडच्या वास्तव्यात मारवा रागाची तालीम आणि कृष्णराव पंडित, कुंडलगुरू बाळाभाऊ उमडेकर व राजाभैय्या पूँछवाले ह्यांच्याकडच्या श्रवणभक्तीतून गायनाचे मूलभूत संस्कार त्यांना लाभले. राजाभैय्यांच्या सूचनेवरून ते खडकपूरला केशव लुखे यांच्याकडे गेले; पण ते वास्तव्य निष्फळ ठरले. पुढे कोलकात्याला पहाडी संन्याल ह्या बॉम्बे टॉकीजच्या अभिनेत्याने त्यांना गांधारी हा अनवट राग शिकवला. तेथून त्यांनी दिल्ली व मग जालंदरकडे प्रयाण केले. तेथील आर्य संगीत विद्यालयाचे अंधचालक धृपदिये मंगतराम यांच्याकडे धृपद संगीताची तालीम मिळाली व सोबतच भरपूर व्यायाम, सकस आहार यांमुळे त्यांची तब्येतही सुधारली. त्यांचा पहिला विवाह सुनंदा कट्टी या त्यांच्या मामेबहिणीशी झाला-१९४३. आणि दुसरा विवाह त्यांनी नागपूरमध्ये पूर्वाश्रमीच्या वत्सला मुधोळकर या गायिकेशी केला- १९५१.

हरिवल्लभ संगीत संमेलनात भेटलेल्या पं.विनायकबुवा पटवर्धनांनी दिलेला सवाई गंधर्वांकडे गाणे शिकण्याचा सल्ला शिरोधार्य मानून भीमसेन घरी परतले. वडलांनी त्यांना कुंदगोळला सवाई गंधर्व-रामभाऊ कुंदगोळकर यांच्याकडे रुजू केले; पण वयाच्या चौदाव्या वर्षी आवाज फुटल्याने आवाजावर मेहनत करत थोडी तालीम आणि जास्त श्रवणभक्ती करावी लागली. पण गुरुभगिनी गंगूबाई हनगल, गुरुबंधू नाडगीर, पं.मल्लिकार्जुन मन्सूर, सुरेशबाबू माने यांचे गायन ऐकायला मिळाले. सवाई गंधर्वांकडे त्यांनी निरलसपणे गुरुसेवा करून व अतिशय कष्टाने गानविद्या संपादन केली. गंधर्वांनी पुढच्या शिक्षणाला अचानक नकार दिल्यामुळे भीमसेन रामपूर संस्थानात मुश्ताक हुसेनखाँ साहेबांकडे गेले. तिथे वर्षभर नटमल्हार घोटला. पुढे सवाई गंधर्वांनी भीमसेन यांना पुन्हा बोलावले. त्यांच्याकडे तोडी, मुलतानी व पूरिया या फक्त तीन रागांचा सराव तीन वर्षे चालला. पण आसावरी, पूरिया धनश्री, तोडी, पूरिया, भैरवी, नटमल्हार या रागांचा गंधर्वांनी केलेला रियाज ऐकून गायनातील काळाचे अचूक भान व घराण्याच्या शिस्तीचे धडे मिळाले. मंद्र व तारसप्तकात आवाज सहजपणे फिरावा म्हणून त्यांनी दिवसाकाठी चौदा-चौदा तास मेहनत केली. त्यामुळे प्रसन्न होऊन गंधर्वांनी त्यांना उदारहस्ते गानविद्या दिली. त्यांच्या मैफली ऐकून मैफलीच्या गाण्याचे नियोजन कसे करावे, श्रोत्यांनुसार कोणत्या रागांची व गानप्रकारांची निवड करावी, या गोष्टी भीमसेनांनी आत्मसात केल्या. सवाई गंधर्वांच्या षष्ट्यब्दीपूर्तीच्या पुण्याच्या समारंभात सन १९४६मध्ये ते प्रथमच चमकले.

पं.भीमसेन लखनौ आकाशवाणी केंद्राचे मान्यताप्राप्त कलाकार झाल्यामुळे चरितार्थाचा प्रश्न सुटला. इथेच त्यांना थिरकवा साहेबांचा तबला, निस्सार हुसेनखाँचे वडील फिदाहुसेनखाँ यांचे गाणे मनसोक्त ऐकावयास मिळाले. बेगम अख्तर, व्ही.जी.जोग, गिंडे, भट, रातंजनकर, रसूलनबाई यांच्याशी त्यांचा परिचय झाला. बिस्मिल्लाखाँशी तर स्नेहच जडला होता. मुंबई व निजाम या रेडिओ केंद्रांशी ते जोडले गेले. त्यांना गायनाची निमंत्रणे आल्यामुळे मैफलीचे तंत्र अवगत झाले आणि जीवनाला सुखद कलाटणी मिळाली. सन १९५३साली कोलकात्याला झालेल्या एंटाली संगीत महोत्सवात त्यांनी सादर केलेल्या गायनास बंगाली रसिकांनी भरभरून दाद दिली. भीमसेनांची कीर्ती देशात व विदेशांतही पसरत गेली. त्यांच्या मैफलींना सर्वत्र अमाप लोकप्रियता लाभली आणि आर्थिक सुबत्तेबरोबर अनेक मानसन्मानही लाभले. सवाई गंधर्वांची मूळची स्वरप्रधान, आलापचारीची व माफक आक्रमक अशी गायकी भीमसेनांनी अधिक आक्रमक, अधिक गतिमान आणि पहिल्या सुरापासून पकड घेणारी अशी केली. त्यांच्या गायकीच्या या वैशिष्ट्यांमुळेच संगीतेतिहासात त्यांचे स्थान अजरामर झाले आहे. सन १९६८ साली 'धन्य ते गायनीकळा' या नाटकाचे त्यांनी संगीत-दिग्दर्शन केले. गुळाचा गणपती, बसंतबहार, भैरवी, पतिव्रता, स्वयंवर झाले सीतेचे या चित्रपटांसाठी त्यांनी पार्श्वगायन केले. संतवाणी हा अभंगांचा व रंगवाणी हा नाट्यगीतांचा खास आविष्कार, बालमुरलीकृष्णन् या दाक्षिणात्य संगीततज्ज्ञाबरोबरची जुगलबंदी, स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर यांच्यासोबतचे ध्वनिमुद्रण, सन १९९७साली भारतीय स्वातंत्र्याच्या सुवर्ण महोत्सवात संसदेत सादर केलेले वंदे मातरम्, मिले सूर मेरा तुम्हारा या राष्ट्रैक्याच्या बहुभाषिक गीतातील प्रमुख सहभाग ही त्यांची मैफलींशिवायची गानविविधता आहे.

पं. भीमसेन जोशी यांना शासनाकडून पद्मश्री-१९७२, पद्मभूषण- १९८५, पद्मविभूषण- १९९९ या व सन २००८मध्ये 'भारतरत्न' या सर्वोच्च राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यांव्यतिरिक्त संगीतरत्न- १९७१, संगीत नाटक अकादमीचा पुरस्कार- १९७६ इत्यादी सन्मान त्यांना लाभले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, गुलबर्गा विद्यापीठ व टिळक महाराष्ट्र विद्यापीठ यांनी त्यांना सन्मान्य डी.लिट पदवी प्रदान केली. जेम्स बेवरजि व हिंदी कवी गुलजार यांनी त्यांच्या जीवनावर लघुपट बनविला आहे. सवाई गंधर्वांना देवाज्ञा झाल्यावर-१९५२, नानासाहेब देशपांडे-सवाई गंधर्वांचे जावई व पं.भीमसेन यांनी पुण्यात 'सवाई गंधर्व पुण्यतिथी संगीत महोत्सव' सुरू केला. त्यास उत्तरोत्तर श्रोत्यांचा वाढता प्रतिसाद मिळाला. पुढे सवाई गंधर्व संगीत महोत्सव हा राष्ट्रीय स्तरावरचा कार्यक्रम झाला. या महोत्सवास नामांकित गायक-गायिका हजेरी लावतात. पं.भीमसेन यांच्या गायनाने या महोत्सवाचा शेवट होत असे. किराणा घराण्याचा भीमसेन जोशी यांचा गानवारसा त्यांचे पुत्र श्रीनिवास जोशी आणि शिष्य माधव गुडी, उत्तमराव पाटील, श्रीकांत देशपांडे व उपेंद्र भट हे पुढे चालवत आहेत, हे विशेष!

अखेरची काही वर्षे प्रकृती-अस्वास्थ्यामुळे ते गाऊ शकत नव्हते; पण या उत्सवात ते उपस्थित राहत. पत्नी वत्सलाबाईंचा मृत्यू व स्वतःच्या झालेल्या नऊ शस्त्रक्रिया ह्यांमुळे ते जरा विकल व एकाकी झाले होते. त्यातच त्यांचे पुणे मुक्कामी वृद्धापकाळाने दि.२४ जानेवारी २०११ रोजी दुःखद निधन झाले.

!! पं.भीमसेन जोशी पावन स्मृतिदिनी त्यांना व त्यांच्या अजरामर कार्यकौशल्याला विनम्र अभिवादन !!

- संत चरणरज -
बापू- श्रीकृष्णदास निरंकारी.
वंदनीय राष्ट्रसंत श्रीतुकडोजी महाराज चौक.
मु.रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त व्हॉट्सॲप- ९४२३७१४८८३.

सायकल...

आबांची आजूची
लाडाची गं परी
बर्थडेला आणली
ट्राईसिकल भारी

नटून थटून बसते
सोनूलीची स्वारी
ट्रिंग ट्रिंग आवाज
पोचला घरो घरी

पांड्यासंगे सवार
परी सायकलवरी
कॉलनीभर मजेत
फिरायं निघे वारी

मऊमऊ सीट ते
दिसते सशा परी
चमचम दिवे पहा
रंगीत कसे भारी

सावकाश चालव
धडधड होई उरी
जवळचं खेळ गं
नकोस जाऊ दूरी

पहा किती नखरे
टम्म फुगली पुरी
माझे बालपणाची
इच्छा झाली पुरी

लिंबलोणओवाळू
काढू दृष्ट परोपरी
मिळो तुला हवे ते
सुखे सगळी सारी

- हेमंत मुसरीफ , पुणे.
९७३०३०६९९६

आंबाई...

कोकण
आजोळ
आलीआंबागाडी
घरामध्ये लावली
गवत घालू आढी

कॉलनीभर मस्त
सुगंधाची गोडी
बालचमूच्या त्या
पडू लागे धाडी

आंबे पाहे मित्र
मारती उंच उडी
आजकाल माझी
काढत ना खोडी

चोखून खा आंबे
किंवा करा फोडी
आम रसात तूप
अहा काय गोडी

आई वाटते आंबे
कैरी ही देई थोडी
आंबे खाण्यापेक्षा
वाटण्यामधे गोडी

आंब्यामधे साखर
जाते कशी वेडी
प्रश्न मला नेहमी
पडायचा हरगडी

शिकवलं आईनं
सुटली सारी गोडी
आंब्याहूनि आईत
असे जास्त गोडी

- हेमंत मुसरीफ पुणे
९७३०३०६९९६.

मरावे परी कीर्तीरुपी उरावे! - दिघोरीच्या रतनसुत्त बुद्ध विहारात २५ व्यक्तींनी केला देहदानाचा संकल्प

नागपूर ■ गौरव मानकर



मानवाचे शरीर हे नश्वर आहे. हेच जीवनाचे अखेर सत्य आहे, अशी तथागत बुद्धांची शिकवण आहे. जीवनाचे हे सार ओळखून आपले शरीर कुणाच्या कामात यावे किंवा शरीरापासून संशोधनास मदत व्हावी, हेच ध्येय मनाशी ठरवून दिघोरी रतनसुत्त बुद्ध विहारात तब्बल २५ व्यक्तींनी मरणोत्तर देहदानाचा संकल्प केला. अनुसयाबाई दशरतराव बांबोडे यांच्या स्मृतिप्रित्यर्थ, इक्वलिटी कल्चर इन्स्टिट्यूट, रतनसुत्त बुद्ध विहार येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी विचार मंचावर नागपूर शासकीय वैद्यकिय महाविद्यालयातील शरीररचना शास्त्र विभागाचे विभागप्रमुख प्रा.डॉ. अरुण कसोटे, डॉ.कांचन वानखेडे, डॉ.अविनाश गावंडे, बहार फाउंडेशनचे संचालक डॉ.अशोक उरकुडे, प्रदीप बांबोडे तसेच देविदास बांबोडे उपस्थित होते. यावेळी मंचावर सर्व पाहुण्यांना बुद्ध आणि त्यांचा धम्म हा ग्रंथ भेट देण्यात आला.

मरावे परि कीर्तीरुपी उरावे' अशी मराठीत एक म्हण आहे. जिवंतपणी माणूस समाजाच्या कामी येत असतोच; पण मृत्यूनंतरही तो उपयोगी पडू शकतो, हे आधुनिक विज्ञानाने सिद्ध केले आहे. योग्य प्रमाणात अवयवदान होत नसल्याने आजही कित्येक जण हे विविध अवयवांच्या प्रतीक्षेत आहेत. मृतदेह जाळून नदी किंवा तलावात राख विसर्जन करण्यात येते. यामुळे जलप्रदूषण होते. ते टाळण्यासाठी देहदान उत्तम पर्याय आहे. मरणोत्तर अवयवदानामुळे अन्य कोणीतरी हे सुंदर जग पाहू शकेल, या भावनेतून दिघोरी येथील रतनसुत्त बुद्ध विहारात अनेकांनी देहदानाचा संकल्प केला.

कार्यक्रमाचे संचालन पंकज पाटील यांनी केले तर आभार दर्शना मेश्राम यांनी मानले. या कार्यक्रमाला यशस्वी करण्यासाठी दिघोरीउपासिका संघाच्या अध्यक्षा निता डोंगरे, सचिव लता तायडे यांनी अथक परिश्रम घेतले. याप्रसंगी धम्म प्रशिक्षक प्रा. सुभाष शेंडे, समता सेवा संघाचे सचिव पुरुषोत्तम गजभिये, प्रबुद्ध युवक मंडळाचे अध्यक्ष मुकेश ढोक, संघटनेचे पदाधिकारी सक्रिय पदाधिकारी किशोर उके प्रामुख्याने उपस्थित होते. तसेच रंजू रंगारी, प्रियांका नागदेवते, वर्षा नीतनवरे, पुष्पा बनकर, भारती सोंडवले, कमल चौधरी, इतर नागरिक उपस्थित होते.

भाजपाच्या वतीने कारसेवकांचा सत्कार



नरखेड ■ अतुल दंढारे

अतिशय आव्हानात्मक परिस्थितीत, प्राणांची व घरादाराची पर्वा न करता श्रीराम जन्मभूमी मुक्ती आंदोलनात सहभागी वीर कारसेवकांप्रति कृतज्ञता व्यक्त करणारा भव्य सन्मान सोहळा आज भारतीय जनता पार्टी नरखेडच्या वतीने संपन्न झाला. शाल श्रीफळ व गुलाबपुष्पगुच्छ देऊन श्री संजय गुरव व श्री राममूर्ती रेवतकर या कारसेवकांना सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी भाजपा काटोल विधानसभा सह प्रमुख शामराव बारई, भाजपा अध्यक्ष राजेश क्षिरसागर, संजय कामडे, प्रा. प्रमोद वघाळे, सुरेश शेंदरे, सुनील मोहोड, अशोक कळंबे, प्रमोद वैद्य, दीपक महाजन, सुनील बालपांडे, धनराज खोडे, प्रकाश सनेशर, संदीप मेंतकर, गुणवंत गिरडकर, सारंग दळवी, संजय गुरमुळे, विजय दातीर, अतुल भालेराव, मुरलीधर वैद्य, रणजित गजबे, गोलू सोमकुवर, राजू कामळे, गिरीधर रेवतकर, पंकज वैद्य, कविता शेंदरे, नलिनी धकीते, प्रमिला वानोडे, प्रशांत बालपांडे, शरद वैद्य, वामनराव बालपांडे, झुबेर शेख, लीलाधर रेवतकर, पुरुषोत्तम वैद्य, अशोक काकडे, भूषण रेवतकर, शुभम वानखेडे, मनीष अरखेल, अशोक वैद्य, रमेश दातीर आदी मोठ्या संख्येनी कार्यकर्ते उपस्थित होते.

वायगाव (ह) येथिल नवीन ग्रामपंचायतीच्या इमारतीचे आमदार समिरभाऊ कुणावार यांच्या हस्ते पार पडले लोकार्पण

समुद्रपूर ■ अमोल झाडे



समुद्रपुरः तालुक्यातील वायगाव (ह) येथे हिंगणघाट विधानसभा श्रेत्राचे आमदार समिरभाऊ कुणावार यांच्या पुढाकाराने२०२२/२३ अंतर्गत जिल्हा वार्षिक योजनेतून नविन ग्रामपंचायत मंजूर करण्यात आला असून या नविन इमारतीच्या लोकार्पण सोहळ्याचे आयोजन २३ जानेवारी ३ वाजता करण्यात आले होते यावेळी उद्घाटक म्हणून आमदार समिरभाऊ कुणावार तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी नगराध्यक्ष गजानन राऊत, भारतीय जनता पक्षाचे तालुकाध्यक्ष वामनराव चंदखेडे, डॉ रीतेश चन्ने, केशवराव भोले, प्रभाकर घुमडे शेषराव तुळणकर,सरपंच उत्तम घुमडे आदी प्रामुख्याने उपस्थित होते यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, वैराग्य मुर्ती संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली यावेळी आमदार समिर कुणावार यांनी फित कापूस नवीन इमारतीचे लोकार्पण केले.

यावेळी आपल्या प्रास्ताविकातून सरपंच उत्तम घुमडे यांनी नवीन सभागृहात मंजूर करावे अशी मागणी आमदार समिर कुणावार यांच्याकडे केली.यावेळी उपस्तिथ नागरिकांना आमदार समिर कुणावार यांनी मार्गदर्शन केले.या कार्यक्रमाला उपसरपंच सुनिताई गलांडे, ग्रामपंचायत सदस्य गजानन पाटील, अतुल गलांडे, स्वप्नील पाटील,विजय मरसकोल्हे, उषाताई देवगडे, प्रणालीताई वाटे,लताताई दिने, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष कवडुजी दांडेकर,संदिप भोले,आदी प्रामुख्याने उपस्थित होते या सोहळ्याचे संचालक ग्रामसेक ए.एल.तपासे, आभार प्रदर्शन पोलिस पाटील आशिष पाटील यांनी केले. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने गावातील महिला पुरुष उपस्तिथ होते.

श्री ज्वालागिर महाराज देवस्थान नरखेड प्रवेश द्वाराचे भूमिपूजन सोहळा संपन्न!

नरखेड ■ अतुल दंढारे



महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री मा.श्री देवेंद्रजी फडणवीस व भाजपा प्रदेशाध्यक्ष मा.श्री चंद्रशेखरजी बावनकुळे यांनी भाजपा नगरविकास आघाडीचे जिल्हाध्यक्ष श्री मनोजजी कोरडे यांच्या माध्यमातून उपलब्ध करून दिलेल्या निधीतून नरखेड येथील श्री ज्वालागिर महाराज देवस्थान प्रवेश द्वाराचे भूमिपूजन सोहळा संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी देवस्थानचे अध्यक्ष श्री महादेवरावजी काळबांडे होते. या कार्यक्रमास श्री शामरावजी बारई, श्री राजेश क्षिरसागर, श्री संजयजी कामडे, श्री मनीष दुर्गे, श्री रमेशजी ठाकरे, श्री सारंग दळवी, श्री महादेवरावजी गुजर, श्री गोविंदरावजी पोतदार, श्री गिरी महाराज, श्री राजेंद्रजी वानखेडे, श्री राजेशजी झाडे, श्री रामरावजी झाडे, श्रीरामजी नवघरे, श्री प्रकाशजी झाडे, श्री सुधाकरजी काळे, श्री राजुजी कुऱ्हाडे श्री बाबरवजी ठाकरे, श्री भाबुतरावजी ठाकरे, श्री लीलाधरजी काळे, श्री प्रभाकररावजी सुहागपुरे, श्री भीमरावजी झाडे, श्री प्रकाश जी ठाकरे श्री श्री अरूणरावजी झाडे श्री मारोतिजी गुजर आदींची उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री सुरज झाडे,श्री पंकज ढोरे, श्री वासुदेव ठाकरे, श्री दिनेश मानकर, श्री निलेश पोतदार, श्री रुपेश अजमेरा, श्री राहुल कोठे, श्री पंकज कुरेकर श्री हेमंतजी बोरकर, श्री संदीप कठाळे श्री अजय ठाकरे श्री गोपाळ चरडे, श्री गौरव गुरमुळे, श्री शुभम बोडखे श्री गौरव ठाकरे श्री शुभम जवादे श्री गजेंद्र ठाकरे श्री नितीन गुजर श्री राजेश गुजर श्री गोपालजी गुजर श्री प्रज्वल ठाकरे, श्री रामदास मेटांगळे व अनेकांनी सहकार्य केले.

कोराडी मंदिरात आनंदोत्सवाचा 'विश्वविक्रम'राम प्राणप्रतिष्ठापना दिनाचा उत्सव जल्लोषात

'राम हलवा' उपक्रमाची कोराडी मंदिराच्या नावे नोंद
'जय श्री राम'चे २५ हजार दीपक उजळले
देवेंद्र फडणवीस यांची उपस्थिती, उपक्रमाची केली प्रशंसा





कोराडी ■ दिलीप येवले

अयोध्येतील भव्य राम श्रीराम मंदिरात प्रभू श्री रामाची प्राणप्रतिष्ठापना होत असताना तेथून शेकडो किमी अंतरावरील कोराडी येथील श्री महालक्ष्मी जगदंबा मंदिरातही हजारो भाविकांच्या उपस्थितीत 'जय श्री राम' चा जयघोष झाला. २५ हजार दीपक उजळवून तसेच ६ हजारांहून अधिक किलोचा 'राम हलवा' तयार करून 'आनंदोत्सवाचा विश्वविक्रम' करण्यात आला.

उपमुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांनी कोराडी मंदिरात सुरू असलेल्या 'राम हलवा' उपक्रमाला भेट दिली. श्री महालक्ष्मी जगदंबा संस्थानचे अध्यक्ष तथा भाजपाचे प्रदेशाध्यक्ष श्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह फडणवीस यांनी 'राम हलवा' तयार करण्यात मदत केली. राम हलवा तयार होत असतानाच अयोध्येत श्री राम प्रतिष्ठापनेचे थेट प्रक्षेपण सुरू होते.

पंतप्रधान मोदी अयोध्येत पूजन करीत असतानाचा कोराडी मंदिर परिसरातही जयघोष निनादत होता. १००० फूट भव्य स्क्रीनवर श्री रामाच्या मूर्तीचे दर्शन होताच संपूर्ण मंदिर परिसरात 'जय श्री राम' हा एकच जयघोष निनादला. फटाक्यांची आतशबाजी करण्यात आली.पंतप्रधान मोदी अयोध्येत श्री रामाची आरती करीत असतानाच संस्थानचे अध्यक्ष श्री बावनकुळे यांनीही कार्यक्रम स्थळी लावण्यात आलेल्या प्रभू श्री रामाच्या मूर्तीचीही पूजा व आरती केली. श्री रामाचा जयघोष परिसरात गुंजत असताना धार्मिक व भावनिक वातावरण निर्माण झाले होते.प्रभू श्री रामाची प्राणप्रतिष्ठापना झाल्यावर मंदिर परिसरातील भाविकांनी एकमेकांना शुभेच्छा दिल्या. यानंतर १८०० किलो कढईत तयार करण्यात आलेला ६००० हून अधिक किलोचा 'राम हलवा' मिष्ठान्न हा प्रसाद भाविकांना वितरित करण्यात आला. हा राम हलवा नागपूर शहरातील काही मंदिरांसह कामठी व कोराडी परिसरातील बहुतांश गावातील मंदिरातून वाटप करण्यासाठी पाठविण्यात आला.

श्री महालक्ष्मी जगदंबा संस्थान कोराडी तसेच श्रीमती विमलादेवी जैन ट्रस्ट व डी.पी. जैन यांच्या सहकार्याने सुप्रसिद्ध शेफ विष्णू मनोहर यांनी १८०० किलो वजनाच्या हनुमान कढईत ६००० किलो रामहलवा तयार करण्यात आला. सकाळी ६.३० वा. श्री बावनकुले यांनी हनुमान कढईत तूप ओतून 'रामहलवा' शिजविणे सुरू केले. दुपारी राम हलवा तयार झाल्यावर आशिया बुक ऑफ रेकॉर्डस व इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्सवर या उपक्रमाची श्री महालक्ष्मी जगदंबा संस्थान कोराडीच्या नावाने अधिकृत नोंद घेण्यात आली. विश्वविक्रम केल्याबद्दल मंदिराचे अध्यक्ष श्री चंद्रशेखर बावनकुळे व शेफ विष्णू मनोहर यांनी दोन्ही संस्थांकडून विश्वविक्रमाचे पदक व प्रमाणपत्र स्वीकारले. दोन्ही संस्थांचे क्युरेटर डॉ. मनोज तत्वादी यांनी या विक्रमाची नोंद इतर ६ संस्थांनी घेतल्याची माहिती दिली.कोराडी मंदिर परिसरातील श्री राम मंदिरात चंद्रशेखर बावनकुळे यांनी महापूजा केली. देवेंद्र फडणवीस यांनीही राम मंदिराला भेट देत दर्शन घेतले. जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनीही कोराडी मंदिरातील राम हलवा उपक्रमाला भेट दिली.

सायंकाळी कोराडी मंदिरात २५ हजार दिवे रांगेत लावून जय श्री राम हे नाव लिहिन्यात आले. हे सर्व दीप सायंकाळी उजळण्यात आले त्यामुळे मंदिर परिसारात मनोहारी दृष्य साकारले. ही दीपमाळा पाहण्यासाठी मोठ्या संख्येत भाविकांनी सायंकाळी कोराडी मंदिरात उपस्थिती लावली.राम हलवा या उपक्रमाला आमदार टेकचंद सावरकर, ज्योती बावनकुळे, संकेत बावनकुळे, माजी आमदार अनिल सोले, महादुला नगराध्यक्ष राजेश रंगारी व सर्व नगरसेवक, कोराडीचे सरपंच नरेंद्र धनोले, उपसरपंच आशिष राऊत व सर्व सदस्य, भाजपा जिल्हा महामंत्री अनिल निधान, अरविंद गजभिये भाजपा नागपूर जिल्हा महिला मोर्चा अध्यक्ष अनुराधा अमीन, महालक्ष्मी संस्थान चे सचिव दत्तू समरितकर, नंदू बजाज, केशवराव फुलझेले, अजय विजयवर्गीय, अशोक खानोरकर, सुशीला मंत्री, राम तोडवाल, प्रितम लोहसारवा, भाऊराव गोमासे, लिलाधर भोयर यांच्यासह मोठ्या संख्येने भाविक उपस्थितीत होते.

प्रजासत्ताक महोत्सव २०२४ चे उत्साहात उद्घाटन

विरुळ (आ.) ■ विनोद महाजन



ग्रामपंचायत विरुळ अंतर्गत २२ ते २६ जाणे विविध शैक्षणिक उपक्रम व सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन

ग्रामपंचायत विरुळ (आ)अंतर्गत विविध कार्यक्रमाचे आयोजन दि.२२ जाने ते २६ जाने २०२४ या प्रजासत्ताक सप्ताहात विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव मिळावा, त्यांना व्यासपीठ उपलब्ध व्हावं ,पुढे जाण्याचा आत्मविश्वास प्रबळ व्हावा व प्रजासत्ताक या भारतीय लोकशाही संकल्पनेचा अर्थ आत्मसात व्हावा या उद्देशाला घेऊन प्रजासत्ताक महोत्सव २०२४ उपक्रमाचे आयोजन करण्यात आले असून २२ जानेवारीला राजीव गांधी भवन ग्रामपंचायत विरुळ येथे द्वारकताई इडमवार , मोहनभाऊ मोहिते यांच्या हस्ते सरपंच अँड दुर्गाप्रसाद मेहरे यांच्या उपस्थितीत या प्रजासत्ताक मोहत्सवाचे उत्साहात उदघाटन करण्यात आले.

या पाच दिवस आयोजीत प्रजासत्ताक महोत्सवाला घेऊन शिक्षक, विद्यार्थी व ग्रामस्थांमध्ये उत्साहाचे वातावरण असून या उपक्रमा अंतर्गत विविध स्पर्धेचे आयोजन केले आहे या उपक्रमात सहभागी होण्यास विद्यार्थी उत्साही आहेत. या उपक्रमात वक्तृत्व स्पर्धा, वादविवाद स्पर्धा, रांगोळी स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन असून प्रजातांत्रिक मूल्य हि संकल्पना घेऊन या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे व स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांना प्रजासत्ताक दिनाला प्रोत्साहन बक्षीस वितरण होणार आहे.

प्रजासत्ताक महोत्सव २०२४ या उपक्रम उडघाटनाला प्रमुख अतिथी म्हणून द्वारकताई इडमवार, मोहन मोहिते,सरपंच अँड दुर्गाप्रसाद मेहरे, ज्ञानेश्वर उईके, सोनाली उघडे, मॉडेल हायस्कूल, नेहरूविद्यालय, राजकुल कॉन्व्हेंट, जिल्हा परिषद शाळा येथील शिक्षक व विदयार्थी उपस्थित होते, कार्यक्रमाचे संचालन निखिल नागोसे यांनी केले तर आयोजन ग्रामविकास अधिकारी पि. पि. खंडागळे ,छोटू मेश्राम, अविनाश तेलंगे यांनी केले आयोजनास सहकार्य ग्रामपंचायत कर्मचारी शंकर परटके, सतीश उरकुडे, निलेश वानखेडे, इंदिराबाई माकोडे आदींनी केले.

राममंदिर सोहळ्यानिमित्त सात हजार किलोचा प्रसाद
उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत कोराडी येथे उपक्रमाला सुरुवात

नागपूर ■ दिलीप येवले



अयोध्या येथील श्रीरामजन्मभूमीत रामलल्लांच्या मूर्तीची प्रतिष्ठापणानिमित्त कोराडी येथील महालक्ष्मी जगदंबा संस्थानद्वारे सात हजार किलोचा रामहलवा प्रसाद आज तयार करण्यात आला. हा प्रसाद तयार करण्यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपला सहभाग नोंदवून उपक्रमाला सुरूवात केली.

आमदार चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुढाकाराने शेफ विष्णू मनोहर यांचेद्वारे एकूण सात हजार किलो सामग्रीतून मोठ्या कढईत प्रसाद तयार करण्यात येत आहे. त्यामुळे प्रसाद बनविण्याचे सर्व विक्रम मोडित निघतील असे उपमुख्यमंत्री पुढे बोलतांना म्हणाले. प्रसाद तयार करण्यासाठी हनुमान कढई तयार करण्यात आली असून ही कढई अयोध्येला देखील जाणार असून तेथे देखील सर्वाधिक प्रसाद तयार करण्याचा नवीन विक्रम नागपूरच्या नावे प्रस्थापीत होईल, असा विश्वास उपमुख्यमंत्री यांनी यावेळी व्यक्त केला.

तत्पुर्वी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कोराडी मंदिरात श्री महालक्ष्मी जगदंबा देवीची आरती करून दर्शन घेतले. आमदार चंद्रशेखर बावनकुळे तसेच मंदिराचे विश्वस्त समितीचे पदाधिकारी याप्रसंगी उपस्थित होते.

श्रीराम मूर्तीची प्रतिष्ठापणा हा भावनिक आणि परमभाग्याचा क्षण

अनेक वर्षांच्या प्रतिक्षेनंतर अयोध्या येथे देशवासियांच्या स्वप्नातलं भव्य राम मंदिर तयार होवून श्रीराम मूर्तीची प्रतिष्ठापणा होत आहे. ज्या क्षणाकरिता संघर्ष केला, तुरुंगात गेलो, गोळ्या आणि लाठ्या अनुभवलं, तो क्षण आज 'याची देही, याची डोळा बघणं' बघता येणे हा भावनिक आणि परमभाग्याचा क्षण असल्याची प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री यांनी याप्रसंगी दिली.

विरुळ नगरी रामाच्या गजराने दुमदुमली; जय श्री राम,एक हि नारा एक हि नाम जय श्री राम

विरुळ (आ.) ■ विनोद महाजन



विरुळ आकाजी : अयोध्या येथे प्रभू रामचंद्र यांच्या प्राणप्रतिष्ठा सोहळा अयोध्येत पार पडला त्यानिमित्ताने विरुळ आकाजी येथे काल २२ जानेवारी ला दुपारी बँड बाजा टाळ मृदुंग च्या गजरात जय श्री राम बजरंग बली की जय या नादाने विरुळ नगरीत उत्सवात दुमदुमली.

या वेळी गावातून बँड बाजा सह भजन दिंडी, पताका तसेच ट्रॅक्टर ला सजवून त्यामध्ये प्रभू रामाचे मोठा फोटो लावण्यात आले होते तसेच राम लक्ष्मण सीता हनुमान अश्या वेशभूषा बालकांनी परिधान केल्याने सर्वांचे लक्ष वेधून घेत होते ट्रॅक्टर वर सजावट करून भजन दिंडी काढली

या वेळी गावातून शोभायात्रा काढून ठीक ठिकाणी चहा नाश्त्याचे लंगर विविध मंडळाकडून करण्यात आले होते.भजन मंडळी तसेच दिंडीच्या उत्सवात गावात आनंदी व भक्तीमय वातावरण निर्माण झाल्याचे चित्र दिसून येत होते विरुळ नगरीत सर्वत्र घरो घरी भगवे पताके तसेच आपआपल्या घरासमोर मोठमोठ्या रांगोळी काढण्यात आली होती

घरा समोर ग्रामस्थांन कडून दीप प्रज्वलन करुन सर्वत्र दिवाळीचा आनंद साजरा केला होता. या वेळी बाजार चौक भगवामय झाल्याचे चित्र दिसून येत असल्याने जय श्री राम बजरंग बली की जय,एकही नारा एकही नाम जय श्री राम च्या जयघोषाने विरुळ नगरी दुमदुमली होती ठिकठिकाणी ग्रामस्थांनी दीप प्रज्वलन करून जलोष्यात स्वागत करण्यात आले. यावेळी विरुळ गावातील नागरिक ,महिला मंडळ,व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिवशक्ती नगरात श्रीराम प्राणप्रतिष्ठा थाटात



नागपूर ■ दिलीप येवले

नागपूर, दिलीप येवले- : दक्षिण नागपूर येथील श्री हनुमान मंदिर पंच कमिटी शिवशक्तीनगर येथील नागरिक व समस्त रामभक्त च्यावतीने रविवारी दुपारपासून शोभायात्रे ला प्रारंभ झाला होता त्यावेळी पालखी, प्रभू श्रीरामचंद्र, माता सीता, लक्ष्मण व रामभक्त हनुमानजी, विठ्ठल, रुक्मिणीच्या वेशभूषेत सहभाग होता. याप्रसंगी छत्रपती शिवाजी महाराज, झाशीची राणी व गाडगे महाराज, छबरी तसेच इतरही वेशभूषेत होते. शोभायात्रेप्रसंगी मोठ्या संख्येने भक्त गण सहभागी होऊन वस्तीतील वाजत गाजत, नाचत गाजत, जय श्रीरामचे नारे लावत ही शोभायात्रा मंदिरात परत आली. शोभायात्रा सोहळ्यात सर्व रामभक्तानी सहभाग घेऊन शोभायात्रेला उत्सुर्फ प्रतिसाद मिळाला.

सोमवारी २२ जानेवारी रोजी, अयोध्येत झालेल्या प्राणप्रतिष्ठ्या अनुषंगाने भगवान प्रभु श्रीरामाची व श्री विठ्ठल रुख्मीनीची संगमरवरी व तेजस्वी मुर्त्या ची २२ जानेवारीला सकाळी १२:२९ मिनटांनी प्राणप्रतिष्ठा मोठया उत्साहात साजरी करण्यात आली.

श्रीराम प्राणप्रतिष्ठा सोहळ्या निमित्य सुती मिल कामगार संघाच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन

गिमा टेक्स वणी गेटवर माजी नगरसेवक सौरभ तिमांडे यांच्या हस्ते वाटप

समुद्रपूर ■ अमोल झाडे

हिंगणघाट ■ अब्दूल कदीर बख्श



अयोध्या येथे प्रभू श्रीरामलला प्राणप्रतिष्ठा सोहळा निमित्त महाराष्ट्र सुती मिल कामगार संघ गिमा टेक्स प्रा.ली.वणी ता.हिंगणघाट येथे कामगार युनियनच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.त्यावेळी श्रीराम प्रतिमेला माल्यार्पण करुन पूजन माजी नगरसेवक सौरभ तिमांडे व गौरव तिमांडे सोबत आशिष हरबुडे, बंडु काटवले, दिगंबर नवघरे यांच्या सह कामगारांच्या हस्ते करण्यात आले त्यानंतर महाप्रसाद वाटपाला सुरुवात करण्यात आली.

यावेळी महिंद्र चहंनकर,सुनील उमक, संजय भोयर, विद्या राऊत, रेश्मा बेले,आकाश बावणे,संजय नेवारे,विनोद जोडे,संतोष सेजल,संदेश खोडे,अजय भेदुरकर,सचिन शेंडे,गजानन गोटे,विनोद गोटे,महेश मडकम,महेश टाटे इत्यादी कामगार तसेच महाराष्ट्र सुती मिल कामगार संघ गिमा टेक्स वणीचे पदाधिकारी-कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्तीत होते.

हिंदूहृदयसम्राट सरसेनापती मा. श्री.बाळासाहेब ठाकरे व नेताजी सुभाषचंद्र बोस यांची जयंती

हिंगणघाट ■ अब्दूल कदीर बख्श



२३जानेवारी २०२४ रोज मंगळवार ला, हिंगणघाट . शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) या पक्षातर्फे स्थानिक शिवसेना कार्यालय कारंजा चौक येथे ठीक ११:०० वाजता तालुकाप्रमुख श्री. सतीश धोबे, शहर प्रमुख श्री.सतीश ढोमणे यांच्या प्रमुख उपस्थितीत तथा श्री.पंढरीभाऊ कापसे, काँग्रेसचे नेते यांच्या अध्यक्षतेखाली हिंदूहृदयसम्राट सरसेनापती मा. श्री.बाळासाहेब ठाकरे व नेताजी सुभाष चंद्र बोस यांची जयंती कार्यक्रम पार पडला. या ठिकाणी सूत्रसंचालन उपतालुकाप्रमुख प्रकाश अनासाणे यांनी केले तर प्रस्ताविक पर ज्येष्ठ शिवसैनिक तथा माजी नगरसेवक श्री. श्रीधर कोटकर यांनी केले.

श्रीधरभाऊ कोटकर यांनी माननीय बाळासाहेब ठाकरे यांच्या जीवनपटावर विस्तृत माहिती दिली. तसेच युवासेनेचे जिल्हाप्रमुख श्री. अभिनंदन मनोत यांनी सुद्धा आपले मनोगत व्यक्त केले. तसेच माजी नगरसेवक मनीष देवडे यांनी या ठिकाणी नेताजी सुभाषचंद्र बोस व मा.बाळासाहेब ठाकरे यांच्या कार्याबद्दल माहिती या ठिकाणी विषद केली. अध्यक्षीय भाषण श्री. पंढरीभाऊ कापसे यांनी जयंतीनिमित्त करण्यात आले. या ठिकाणी मा. बाळासाहेब ठाकरे व नेताजी सुभाष चंद्र बोस यांच्या जय घोषाने परिसर दणाणून सोडला. नेताजी सुभाषचंद्र बोस की जय !! माननीय बाळासाहेब ठाकरे यांचा विजय असो !!! जय भवानी !! जय शिवाजी !!! तुम मुझे खून दो, मै तुम्हे आजादी दूंगा !! अशा प्रकारच्या घोषणा देत परिसर दणाणून सोडला. कार्यक्रमात मिठाईचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमात शिवसेना महिला आघाडी, युवा सेनेचे पदाधिकारी शिवसैनिक महिला आघाडीच्या शहर संघटिका सौ.सीमा गलांडे, माजी नगरसेविका सौ.नीताताई धोबे, सौ.सीमाताई खूपसरे, नीलिमा मोहम्मारे , सौ.प्राची पाचखेडे, सौ.स्वाती पिंपळकर, भोला सिंग चौहान,शहर संघटक गजानन काटोले,गंगाधर बोधाने, अनंता गलांडे ,संजय पिंपळकर ,आशिष जयस्वाल, भास्कर मानकर, भूषण काटकर युवा सेना शहर प्रमुख ,हिरामण आवारी, सुनील अष्टीकर ,सुरेश चौधरी, भास्कर ठवरे, बंटी वाघमारे, गौरव गडेकर, विनोद मोहोळ ,नितीन वैद्य ,दिलीप वैद्य, शंकर मोहम्मारे ,भास्कर भिसे ,डॉ. जगताप, डॉ.खेवले,दिनेश धोबे, नरेंद्र गुळकरी, गोवर्धन शाहू,महेश वैद्य, दिलीप आमगे, महेंद्र दिक्षित,अनिल कडू, प्रकाश भुसारी, प्रभू बडे, वैभव कापकर, प्रशांत आवारी, निखिल झिबड, अनंता सोरटे, आशिष भांडे ,आकाश सुरकार ,मुन्ना श्रीवास ,रवी रंगारी, ओमकार भोयर, सुभाष काटकर उमेश निरगुडे, रामाजी सातघरे, गुणवंतराव वानखडे ,महेश खडतकर, प्रमोद खडतकर, कवडू कळंबे, महादेव लंबाडे ,देविदास चौधरी ,अंकुश ससाने, गजू टोनपे,अशोक भगत इत्यादी शिवसैनिक युवा सैनिक महिला आघाडीचे पदाधिकारी उपस्थित होते.

अयोध्येतील राम मंदीर हे भारताच्या नव्या अस्मिता पर्वाची सुरुवात: देवेंद्र फडणवीस

नागपूर ■ दिलीप येवले

राम ललाचे दर्शनाला सर्व सोबत जावूया; प्रतिष्ठापना सोहळ्याच्या थेट प्रक्षेपण सोहळ्यात सहभाग;रामनगर येथील मंदीरात राम दर्शन



अयोध्येत भव्य राम मंदीरातील गर्भगृहात राम लला विराजमान होत आहे. हा सर्व भारतीयांसाठी आनंदाचा आणि अभिमानाचा क्षण आहे. ही भारताच्या नव्या अस्मिता पर्वाची सुरुवात आहे. समाजातील सर्व घटकांना समान अधिकार मिळण्याचा क्षण असल्यामुळे आपण सर्व राम ललाच्या दर्शनाला अयोध्येला जावूया, असे भावनिक आवाहन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

अयोध्या येथे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याहस्ते राम मंदीराचे गर्भगुहात राम लला विराजमान होणाऱ्या क्षणाच्या साक्षिदार होत असल्याचा अभिमान आहे. हा क्षण रामनगर येथील राम मंदीराच्या परिसरात लावण्यात आलेल्या भव्य स्क्रीनवर बघण्यासाठी श्री. देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. या सोहळ्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

श्रीराम जन्मभूमी ट्रस्टतर्फे आयोजित या कार्यक्रमास उत्तर भारतीय र्मोच्याचे सुरेंद्र पांडे, माजी आमदार डॉ. आशिष देशमुख, शैलेश जोगळेकर, संजय बंगाले, जयप्रकाश गुप्ता, शाम पत्तरकीने, प्रणिता फुके, अश्विनी जिचकार, संदीप गवई आदी उपस्थित होते.

भारतीय इतिहासात २२ जानेवारी हा महत्तवाचा दिवस असल्याचे सांगतांना उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, राम जन्मभूमी मुक्त करण्यासाठी अनेक आंदोलने झाली. तसेच स्वातंत्र्यानंतर यासाठी संकल्प करण्यात आला. राजकीय स्वातंत्र्यासोबत आध्यात्मिक स्वातंत्र्यासाठी सुरु असलेल्या आंदोलनामुळे अयोध्या येथे भव्य राम मंदीर पूर्ण झाले आहे.कारसेवकांचे बलिदान तसेच कोठारी बंधू यांनी भगवा प्रस्तापित करण्यासाठी केलेला संघर्ष अतुलनिय होता. सर्वांच्या त्यागातून व बलिदानातून आज भव्य राम मंदीर निर्माण झाले आहे. त्यामुळे राम ललाचे दर्शन घेण्यासाठी सर्वांना अयोध्येला जायचे आहे. त्यासाठी आवश्यक व्यवस्था करणार असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.

प्रारंभी रामनगर येथील मंदीराला भेट देवून श्रीरामाचे दर्शन घेतले. अयोध्या येथील श्रीराम मंदीरात राम ललाच्या मूर्तीची प्रतिष्ठापनेचा क्षण सर्वांना अनुभवता यावा तसेच या क्षणाचे साक्षिदार होता यावे यासाठी या परिसरात एलएडी स्क्रीनद्वारे या ऐतिहासिक सोहळ्याचे थेट प्रक्षेपण करण्यात आले होते. सुमारे तीन तास चाललेल्या प्राणप्रतिष्ठा महोत्सवाला मोठ्या प्रमाणात नागरिक उपस्थित होते. यावेळी कारसेवक म्हणून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या श्रीराम जन्मभूमी ट्रस्टतर्फे गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन उत्तर भारतीय र्मोचा तसेच औषधी विक्रेता संघ व विविध सामाजिक संस्थांतर्फे करण्यात आला होता. बंजारा समाजाच्या महिलांनी पारंपारिक नृत्य करुन राम जन्मभूमी उत्सवामध्ये आपला सहभाग नोंदविला.

विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच आपल्या शारीरिक विकासासाठी खेळाकडे लक्ष द्यावेः आमदार समिरभाऊ कुणावार

अंतरगाव येथे पुरस्कार वितरण सोहळ्यात प्रतिपादन

समुद्रपूर ■ अमोल झाडे



समुद्रपुरः आज लहान मोठ्या मुलांचा कदह मोबाईल कडे असुन ते दिवसभर मोबाईलवर खेळ खेळत असुन हि बाब भविष्यात त्यांच्या अतिशय घात होणार आहे यामुळे आतापासूनच विद्यार्थ्यांनी आवश्यकतेनुसार मोबाईलचा वापर करून शिक्षणासोबतच आपला शारीरिक विकास करण्यासाठी मैदानी खेळांवर लक्ष केंद्रित करण्याचे आवाहन हिंगणघाट विधानसभा श्रेत्राचे आमदार समिर कुणावार यांनी अंतरगाव येथे विक्रांत क्रिकेट क्लब द्वारा आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्यात व्यक्त केले.या पुरस्कार वितरण सोहळ्याचे अध्यक्षस्थानी आमदार समिरभाऊ कुणावार तर प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच अशोक फुलकर,उपसरपंच दिनेश नरांजे भाजपा तालुकाध्यक्ष वामनराव चंदनखेडे, सामाजिक कार्यकर्ते विठ्ठलराव चाफले,भाजपा तालुका महामंत्री विनोद कन्हाळकर, मोहगांवचे सरपंच विलास नवघरे,वडगावचे उपसरपंच जिवन गुरनुले,अरुण मोटघरे, मुख्याध्यापक देवडे, आदी उपस्थित होते यावेळी.यावेळी गावकऱ्यांच्या वतीने आमदार समिर कुणावार यांचे मिरवणूक काढून फटाके फोडू मोठ्या जल्लोषात स्वागत करण्यात आले.त्यांनतर संत तुकडोजी महाराज, संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.यावेळी आमदार समिरभाऊ कुणावार यांच्या हस्ते क्रिकेट स्पर्धेत प्रथम विजेत्या उमरेड येथिल संघाला ३० धनादेश व चषक, दुतिय पुरस्कार २५ हजाराचा धनादेश विक्रात क्रिकेट क्लब अंतरगाव.,तृतीय पुरस्कार १५ हजार रुपयांचा धनादेश पाईकमारी संघाला प्रदान करण्यात आला आमदार समिर कुणावार म्हणाले की प्रत्येक युवक विद्यार्थी,विद्यार्धीनीला आज क्रिकेट, कबड्डी, कुस्ती, फुटबॉल अशा शारीरिक विकासाला चालना देणाऱ्या खेळांच्या माध्यमातून आपले भविष्य घडविण्याची संधी आहे.या खेळांच्या माध्यमातून युवक, युवतींना पोलिसांची नौकरी सहज मिळविता येथे सोबतच आपल्या खेळाच्या कौशल्यातून राज्यस्तरीय,राष्ट्रीय पातळीवर खेळून आपल आपल्या कुटुंबाच गावाच नाव लौकीक करता येते.फक्त यासाठी व्यसनापासून दूर राहून मेहनत चिकाटीची आवश्यक आहे.आणि मला विश्वास आहे की अंतरगाव येथिल विद्यार्थी येणाऱ्या काळात खेळातून आपले भविष्य निर्माण केल्याशिवाय राहणार नाही.आपल्या गावाला शिक्षण व खेळा करीता विकासासाठी पाहिजे ते मदत करण्यास मी सदैव तयार असल्याचे मत आमदार समिरभाऊ कुणावार यांनी व्यक्त केले.यावेळी उपस्तिथ मान्यवरांनी सुध्दा आपले विचार व्यक्त केले.या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने गावकरी उपस्थित होते येशस्वी करण्यासाठी विक्रांत क्रिकेट क्लबचे पदाधिकाऱ्यांनी सहकार्य केले.

जय श्रीरामाच्या गजराने साहुर गावात आनंदाचा जल्लोष

साहूर ■ शरद वडकर



अयोध्येतील श्रीराम मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त साहूर व परिसरामध्ये विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते चौका चौकात संपूर्ण गावात रस्त्याच्या दुतर्फी भागाने भगवे झेंडे व पताका लावण्यात आल्या होत्या संपूर्ण परिसर राममय झाल्याची प्रचिती येत होती जय श्रीराम च्या गजराने संपूर्ण साहुर नगरी दुमदुमुन गेली होती येथील कार सेवक तथा भाजपचे जेष्ठ कार्यकर्ते उत्तमराव करांगळे , प्रशांत कापुरे , रमेशचंद्र सरोदे यांच्या मार्गदर्शनात मुख्य हनुमान चौकातून शोभा यात्रेला सुरुवात झाली श्रीराम मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळा दिवाळी सारखा साजरा करण्याचे आवाहन करण्यात आल्यामुळे सर्व मंदिराची स्वच्छता व साफसफाई करण्यात आली तसेच मंदिरावर व काही घरावर सजावट तसेच विद्युत रोषणाई केली होती विविध प्रकारच्या राममूर्ती चे झेंडे प्रत्येकाच्या दारात व रस्त्याच्या दुतर्फी रंगरंगोटी व रस्त्यावर दीपक लावून संपूर्ण सजावट केली होती गावामध्ये शोभायात्रा सुद्धा काढण्यात आली प्राण प्रतिष्ठा उत्सव गावागावात व घराघरात दिवाळीप्रमाणे दिवे उजळून साजरा करण्यात आला संपूर्ण गावातून शोभायात्रा काढून त्यानंतर लक्ष्मीनारायण मंदिरात लीलाधरराव अग्रवाल यांच्या माध्यमातून ग्रंथाचे वाचन करण्यात आले यावेळी शोभायात्रेमध्ये गावातील विविध भजन मंडळ महिला भजन मंडळांनी आपला सहभाग नोंदविलेला होता तसेच गावातील अनेक नागरिकांनी या सोहळ्यात मोठ्या उत्साहात भाग घेतलेला होता त्यानंतर रतनगीर बाबा देवस्थान येथे काल्याचा कार्यक्रम पार पडला याप्रसंगीकार कार सेवक उत्तमराव करांगळे यांनी प्राणप्रतिष्ठेबाबत मार्गदर्शन करताना राम लल्लाची प्राणप्रतिष्ठा केवळ धार्मिक कार्यक्रम नसून तो आपल्या सांस्कृतिक उत्क्रांतीचे प्रतीक आहे ही प्राणप्रतिष्ठा भक्ती संयम आणि दृढ निश्चयाच्या विजयाचे प्रतीक आहे आपल्या समृद्ध संस्कृती वर्षाचे ऐतिहासिक आठवणी आणि आध्यात्मिक मूल्यांचेही ते प्रतिबिंब आहे अयोध्येत बांधलेले हे मंदिर देशासाठी केवळ श्रद्धास्थान नसून तर आपल्या पूर्वजांच्या त्याग आणि दृढ निश्चयाचे कायमस्वरूपी प्रेरणास्थान राहील असे विचार यावेळी व्यक्त करण्यात आले या कार्यक्रमांमध्ये व रॅलीमध्ये मोठ्या प्रमाणे सहभाग घेऊन उत्तमरावजी करांगळे ,प्रशांत भाऊ काकपुरे, दीपक भाऊ काकपुरे, रमेशचंद्रजी सरोदे, प्रकाशराव गायकवाड , प्रकाशराव वाघ , लीलाधरराव अग्रवाल, दीपक भाऊ ढवळे,तसेच अनेक नागरिकांनी यामध्ये सहभाग घेतलेला होता.

तालुक्यातील विविध गावांत पोहचणार शेतकरी संघर्ष यात्रा;युवा संघर्ष मोर्चाचे आयोजन ;२८ जानेवारीला रविकांत तुपकर यांची एल्गार सभा

देवळी ■ योगेश कांबळे



२६, २७ व २८ जानेवारी ला युवा संघर्ष मोर्चाचे अध्यक्ष श्री. किरण ठाकरे यांचे नेतृत्वात शेतकरी संघर्ष यात्रा आयोजित केली असून तिन दिवस ही यात्रा तालुक्यातील विविध गावांतून प्रवास करून शेवटी २८ जानेवारी रोजी रविवार ला स्थानिक गांधी चौक देवळी येथे या शेतकरी संघर्ष यात्रेचा समारोप एल्गार सभेने होणार आहे. या एल्गार सभेला मार्गदर्शन करण्याकरीता शेतकरी नेते श्री. रविकांत तुपकर (बुलढाणा) हे उपस्थित राहणार असून जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या एल्गार सभेला उपस्थित राहण्याचे आवाहन युवा संघर्ष मोर्चाचे तालुकाध्यक्ष श्री. समीर सारजे यांनी केले आहे.

यावर्षी उत्पन्न कमी होऊन देखील शेतीमालाला भाव नसल्यामुळे शेतकरी प्रचंड चिंतेत आहे. शेतकऱ्यांना धीर देण्याकरिता व शेतकऱ्यांना संघटीत करून कापूस, सोयाबीन,तूर व चणा या पिकांच्या भाव वाढीकरीता लढा उभारण्याकरीता व शेतकऱ्यांच्या इतर प्रश्नांना वाचा फोडण्याकरीता या शेतकरी संघर्ष यात्रेचे आयोजन केले आहे. सोयाबीन ला ९००० रू. भाव, कापसाला १२००० रू. भाव, अतिवृष्टीमुळे सोयाबीन च्या झालेल्या नुकसानीची नुकसानभरपाई, पिक विम्याची न मिळालेली रक्कम, शेतमालाची निर्यातबंदी हटवून आयात शुल्क वाढविण्याची मागणी, जंगली जनावरांच्या त्रासातून शेतकऱ्यांची मुक्तता, शेतमालाच्या रक्षणासाठी अनुदानावर कुंपण द्या.

या व इतर मागण्यांसाठी ही शेतकरी संघर्ष यात्रा आयोजित केलेली असून या यात्रेचा पहीला मुक्काम दि. २६ जानेवारी ला भिडी येथे होणार असून त्या ठिकाणी अविनाश काकडे (किसान अधिकार अभियान) यांची जाहीर सभा होणार आहे. दुसर मुक्काम दि. २७ जानेवारी ला गौळ येथे होणार असून त्या ठिकाणी शेती विषयाचे अभ्यासक श्री. विजय जावंधीया यांची जाहीर सभा होणार आहे.

तिनं दिवस शेतकऱ्यांच्या गाठीभेटी घेऊन त्यांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांबाबत चर्चा करून शेवटी दि. २८ जानेवारीला या शेतकरी संघर्ष यात्रेचा समारोप एल्गार सभेने होणार असून त्या सभेला शेतकरी नेते श्री. रविकांत तुपकर हे मार्गदर्शन करणार आहेत. शेतकरी संघर्ष यात्रे निमित्त माहिती देण्यासाठी गावागावात शेतकऱ्यांच्या बैठक सुरू आहे. यामुळे शेतकऱ्यांमध्ये प्रचंड उत्साह असून मोठा प्रतिसाद मिळत आहे. या एल्गार सभेला मोठ्या प्रमाणात शेतकरी व शेतकरी पुत्र सहभागी होणार असल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये प्रचंड उत्साह संचारला आहे.

भगवान प्रभू श्रीरामाच्या मिरवणुकीने येरखेडा दुमदुमले ठिकाणी मिरवणुकीचे स्वागत व प्रसादाचे वितरण

कामठी ■ नंदू कोल्हे



श्रीरामाच्या प्राणप्रतिष्ठा समारंभाच्या पर्वावर तालुक्यातील येरखेडा येथील तारा माता मंदिर पंच कमिटीच्या वतीने भगवान श्रीराम व कलश यात्रेने दुमदुमले ठिकठिकाणी नागरिकांनी शोभायात्रेचे स्वागत करून प्रसादाचे वितरण केले सजविलेल्या रथावर भगवान श्रीराम, लक्ष्मण ,सीता ,हनुमान यांची येरखेडा ग्रामपंचायत चे माजी सरपंच मंगला मनीष कारेमोरे यांचे हस्ते पूजा आरती करून श्रीराम व कलश यात्रेला सुरुवात करण्यात आली कलश यात्रा तारा माता चौक ,रामकृष्ण लेआउट, प्रीती लेआउट, साईप्रसाद लेआउट ,भोयर लेआउट ,उपासे लेआउट ,नगर भ्रमण करीत तारा मंदिरात मिरवणुकीचे समापन करण्यात आले मिरवणुकीचे ठिकठिकाणी नागरिकांनी स्वागत करून प्रसादाचे वितरण केले. मिरवणुकीतील तरुण -तरुणी भगवान श्रीरामाचा जयघोष करून नाचत होते मिरवणुकीत पंचायत समिती सदस्य सुमेध रंगारी टीकाराम भोगे गुरुजी ,जगदीश झाडे, माजी सरपंच मनीष कारेमोरे, दास बाबू ,रुपेश श्रीवास्तव, सुषमा राकडे, गौरीशंकर धीमोले, डॉ किशोर ढोले, मधुकर ढोले ,प्राजक्ता ढोले ,शिला देशमुख ,मीना दास ,यादवराव पाठे, रुपेश पारधी, मनोहर पारधी ,सरिता भोयर ,भाऊराव देशमुख ,राम देशमुख ,चंद्रभान तलमले, प्रा संजय देवडीकर ,वसंतराव फायदे, श्रीकृष्ण इंगोले, ललित गबने,लोनेश्वर देशमुख, उषा कारेमोरे, रजनी कारेमोरे,हेमलता सोनटक्के, किशोर वाहूरकर,संध्या ढिमोले, पुजारी कमलेश सहारे, सह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते शोभायात्रेत राम लक्ष्मण सीता हनुमान यांच्या वेशभूषेत असलेले दिव्यांश सोनटक्के ,श्रीमय ढोले ,चांद पवार ,रियांश मुळे, दृष्टी गेडाम, अध्यास खरवडे ,रुपल भोयर ,रियांश गेडाम, साई पारधी, रिद्धीमा पाठे यांचा पाहुण्यांचे हस्ते भेटवस्तू देऊन गौरव करण्यात आला कार्यक्रमाचे संचालन सुदाम राकडे यांनी केले व आभार प्रदर्शन मनीष कारेमोरे यांनी मानले.

अखिल भारतीय गोस्वामी समाज महासभा अंतर्गत उत्तर नागपूरच्या श्री राम भाव शोभा यात्रेचा समारोप

कामठी ■ नंदू कोल्हे



गोस्वामी समाज महासभा नागपूर व गौरव इन्क्रा यांच्या वतीने अखिल भारतीय गोस्वामी समाज महासभा अंतर्गत उत्तर नागपूरच्या श्री राम भाव शोभा यात्रेचा समारोप झाला. श्री कृष्णकांत गिरी (राष्ट्रीय संघटन मंत्री - अखिल भारतीय गोस्वामी समाज महासभा दिल्ली, अध्यक्ष - गोस्वामी समाज महासभा नागपूर) यांच्या नेतृत्वाखाली व संघटनेत उत्तर नागपुरात भव्य श्री राम शोभा यात्रा काढण्यात आली. या यात्रेची सुरुवात श्री शंकर जी अग्रवाल यांनी केली. , श्री जाधव साहेब (पी. आय. पाचपावली पोलीस स्टेशन) यात्रेत भूमिका बजावलेल्या श्री राम-गौरव गिरी, सीता- कु. गोस्वामी, लक्ष्मण- वैभव गिरी, हनुमान-सागर सचदेव जी यांचा मुलगा, यात्रा गौरव रेसिडेन्सी, आवाडे बाबू चौक. , कमल.चौक, राजपूत भोजनालय, काश्मिरी गल्ली, कालीमाता मंदिर येथून मार्गानुसार भव्य मिरवणूक काढण्यात आली, प्रमुख पाहुणे म्हणून श्री लांबाजी (लंबा सेलिब्रेशन मालक), राजेश नायर (मोती महल मालक), नवनीत तुली, सिंग. जी. त्यात रथ, घोडे, बँड, डीजे व फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली.यामध्ये रेसिडेन्सी उपस्थित होते.उत्तर नागपुरातील मान्यवर व गोस्वामी समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.संपूर्ण संकुल श्री रामाच्या सुरात राममय झाले होते,विशेषतः मान्यवरांनी. कालीमाता मंदिरात यात्रेनंतर अल्पोपाहाराची व्यवस्था कश्मीर गल्लीने केली होती.पोहोचले, मा. श्री कृष्णकांत जी गिरी यांच्या वतीने भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते, त्यात उत्तर नागपूरच्या मानाच्या यात्रेतील सर्व राम भक्तांनी महाप्रसादाचा आस्वाद घेतला.या भव्य यात्रेत आदरणीय मधुकर गोस्वामी, योगेश बन, उत्तम गिरी, मोहन बन, किशोर पुरी, आनंद बन, गिरी, रमेश पुरी, नरेंद्र पुरी, शेखर पुरी, महेश गिरी, राजेंद्र गिरी, नितेश पुरी, प्रदीप पुरी, अनिल गिरी, गणेश पुरी, बाबा पुरी, मुकेश पुरी, सचिन गिरी, आकाश गिरी, सचिन नागो गिरी, सचिन गिरी, बादल गिरी, सचिन गिरी. प्रमुख महिलांच्या उपस्थितीत १०० विणा गिरी, १०० मेघा गिरी, १०० शीला गोस्वामी आणि उत्तर नागपुरातील बहुसंख्य महिला आणि गोस्वामी समाजाच्या बहुसंख्य महिला पदाधिकारी उपस्थित होत्या.शेवटी आदरणीय श्री कृष्णकांत गिरी जी यांनी सर्व राम भक्तांचे स्वागत केले. भव्य यात्रेत उपस्थित. पण कृतज्ञ वाटले.

श्रीराम मूर्ती प्रतिष्ठापना उत्सवा निमित्त आजनीत अवतरली अयोध्या

कामठी ■ नंदू कोल्हे



भगवान श्रीराम मूर्ती प्रतिष्ठापना उत्सवानिमित्त कामठी तालुक्यातील आजनी गाव काल सोमवार २२ जानेवारीला अवघे राममय झाले होते. गावातील चौकाचौकात नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने भगव्या पताका आणि घराघरावर भगवे ध्वज लावून या उत्सवात राम रंग ओतला होता.आदल्या दिवशी गुरुदेव भजन मंडळ तसेच वारकरी भजन मंडळ यांच्या माध्यमातून गणपती देवस्थान परिसरात जागृती करण्यात आली.गावातील हनुमान देवस्थान आणि गणपती देवस्थान येथे सोमवारी सकाळी श्री रामरायाच्या मूर्तीला नरेंद्र लोहकरे महाराज यांच्या हस्ते अभिषेक करण्यात आला.

यावेळी लहान थोरांचा समावेश असलेल्या हजारोंच्या संख्येने जमलेल्या गावकऱ्यांनी गावातून पालखी काढून श्रीरामाचा जयजयकार केला.या पालखी भ्रमण अंतर्गत राम लक्ष्मण सीता हनुमान यांचा वेष धारण करून चिमुकली मुलं मुली मोठ्या आनंदाने सहभागी झाली होती. पालखी आणि श्रीराम झांकी अंतर्गत जिल्हा परिषद शाळा आणि सरस्वती कॉन्व्हेन्टच्या विद्यार्थ्यांचे लेझिम, गावातील सर्व भजन मंडळांचे भजन यांचा समावेश होता. विशेष म्हणजे गावातील महिला मंडळाचा यात सर्वात जास्त सहभाग होता. यावेळी चौकाचौकात फुगडी सुद्धा खेळली गेली.

गावातील सामाजिक कार्यकर्ते तसेच विविध मंडळांनी चौकाचौकात अल्पोहार आणि सरबत, चायची व्यवस्था केली होती.चौका चौकात भगव्या पताका,रांगोळ्या काढून रामारायाच्या पालखीचे स्वागत करण्यात आले. गाव भ्रमण करून आल्यानंतर गणपती देवळात मान्यवरांच्या उपस्थितीत दहीहंडी गोपाळकाला करून पालखीची सांगता करण्यात आली.सायंकाळी घरोघरी तसेच देवस्थान परिसरात दिवे प्रज्ज्वलित करून तसेच फटाके फोडून सर्वांनी आनंद साजरा केला.

लोकवर्गणीतून आयोजित करण्यात आलेल्या महाप्रसादाने या उत्सवाची सांगता करण्यात आली.यात राष्ट्र सेविका समिती रुक्मिणी शाखा, आजनी यांच्याकडून मिष्ठान्न वाटण्यात आले. गावातील जस मंडळाचा संगीतमय कार्यक्रम महाप्रसादाचे वेळी आयोजीत करण्यात आला होता.विविध कार्यक्रम आणि भक्तिमय वातावरणाने गावात प्रती अयोध्या अवतरल्याचा भास यावेळी होत होता.गावातील लहान थोर सर्वांचा या कार्यक्रमात सहभाग होता, हे विशेष.

सिंधुरागिरी महानाट्यातील रामटेकच्या ऐतिहासिक महत्म्याला रसिकांची पसंती महासंस्कृती महोत्सवात लेझर शो, मशाल यात्रा,गीत गायन व आतीषबाजीने वेधले लक्ष

रामटेक ■ जयश्री मेंघरे



रामटेक - रामटेक येथे प्रभू श्रीराम यांच्या वास्तव्याचे महात्म्य व रामटेकची ऐतिहासिक व पौराणिक महती, सिंधुरागिरी महानाट्यातून महासंस्कृती महोत्सवाच्या चौथ्या दिवशी आज सादर करण्यात आली. रामटेकचा इतिहास सांगणाऱ्या या महानाट्याचा हजारो लोकांनी आनंद घेतला.

रामटेक येथील नेहरू मैदानावर सुरू असलेल्या महासंस्कृती महोत्सवाच्या चौथ्या दिवशी लेझर शो, रंगबिरंगी आतीषबाजी, मशाल यात्रा, स्थानिक कलावंताद्वारे गीत गायन व आजचे विशेष आकर्षण असलेले सिंधुरागिरी महानाट्य सादर करण्यात आले.

आमदार चंद्रशेखर बावनकुळे,आमदार ॲड.आशिष जयस्वाल, रामटेकच्या उप विभागीय अधिकारी वंदना सवरंगपते, माजी आमदार मल्लिकार्जून रेड्डी आदी उपस्थित होते. रामटेकच्या पौराणिक इतिहासाची महिमा सांगणाऱ्या या महानाट्याची संकल्पना आ. ॲड.आशिष जयस्वाल यांची असून लेखन अमन कबीर यांचे तर रवींद्र दुरुगकर यांचे दिग्दर्शन, ध्वनी व्यवस्था चारू जिचकार व पुष्कर देशमुख यांचे संगीत आहे. नेपथ्य नाना मिसाळ व सतिश काळबांडे यांचे होते.

पद्मपुराणापासून तर भोसलेकालीन लढाया, नृसिंह अवतार, रामाच्या वनवासाचा कालखंड आदी प्रसंग यात उभे करण्यात आले आहेत. सिंधुरागिरी पर्वताचे महात्म्य यात वर्णन करण्यात आले. रामटेकचा परिसरातील मौर्य शासकांचा कार्यकाल, सातवाहनांच्या काळ, वाकाटकांनी केलेली सत्ता काबीज, महाकवी कालिदासांचे 'मेघदूत', वाकाटककालिन नगरधनचा किल्ला आदी रामटेकशी संबंधित ऐतिहासिक प्रसंग या महानाट्यातून सादर करण्यात आले.हे नाट्य नागपूर व रामटेकच्या सुमारे ७० कलाकारांनी सादर केले. रात्री उशीरापर्यंत चाललेल्या या महानाट्याला प्रेक्षकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली हे विशेष.

रामभक्त चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतले गडमंदिर येथे प्रभू श्रीरामाचे दर्शन

रामटेक ■ जयश्री मेंघरे



रामटेक - अयोध्या येथे प्रभू श्रीरामाचे प्राणप्रतिष्ठा सोहळा पंतप्रधान नरेंद्र मोदींचा हस्ते पार पडला,संपूर्ण देश राममय झाले असताना भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी महाराष्ट्रातील अयोध्या म्हणून ओळख असलेल्या रामटेक येथील गडमंदिरावर जाऊन प्रभू श्रीरामाचे दर्शन घेतले व आरती केली.मनसर येथे माजी आमदार मल्लिकार्जून रेड्डी यांनी श्रीराम जानकी मंदिर येथे चंद्रशेखर बावनकुळे यांचे स्वागत केले.संपूर्ण भक्तिमय वातावरणात श्रीरामाच्या नाऱ्यानी गडमंदीर परिसर दुमदुमले होते.

भाजपा प्रदेशाध्यक्ष यांनी नेहरू मैदान येथे सुरू असलेल्या संस्कृती महोत्सव येथे सुरू असलेल्या सिंधुरागिरी महानाट्यला भेट दिली,महानाट्य कार्यक्रमाला उपविभागीय अधिकारी वंदना सौरांगपते यांनी पुष्पगुच्छ देवून बावनकुळे यांचे स्वागत केले.

प्रामुख्याने माजी आमदार मल्लिकार्जून रेड्डी,आमदार आशीष जयस्वाल,माजी आमदार आनदराव देशमुख,माजी नगराध्यक्ष दिलीप देशमुख,योगेश वाडीभस्मे,राहुल किरपान,संजय मुलमुले,उमेश पटले,नंदकिशोर कोहळे,निलेश हटवार,सुरेंद्र बुधे,सचिन यादव,रणवीर वाघमारे,जयराम मेहरकुळे,आलोक मानकर,संजय बिसमोगरे,उमेश रनदिवे,विशाल भुते सह आदी भाजपा पदाधिकारी उपस्थित उपस्थित होते.

जिल्ह्यात १ लाख १६ हजार मतदारांची वाढ

जिल्हाधिकाऱ्यांची पत्रकार परिषदेत माहिती;अंतिम मतदार यादी प्रसिद्ध

नागपूर ■ दिलीप येवले



१ जानेवारी २०२४ या अर्हता दिनांकावर आधारित मतदार यादीच्या संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत आज अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली. यात जिल्ह्यात १ लाख १६ हजार ७६२ मतदारांची वाढ झाली आहे. यात १७ ते १९ वयोगटातील ८८ हजार ४४९ युवा मतदारांचा समावेश असल्याची माहिती जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.

मिशन युवा एन २०२३-२०२४ कार्यक्रमांतर्गत १७ ते १९ वर्षे वयोगटातील एकूण ७५ हजार किमान नव मतदारांची नोंदणी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते. हे उद्दिष्ट लक्षणीयरीत्या साध्य झाले आहेत. या मोहीमेंतर्गत ८८ हजार ४४९ युवा मतदारांची नोंदणी करण्यात आली आहे.

लिंग गुणोत्तर ९६४ वरून ९७८ झाले आहे. एकूण ४७२ महाविद्यालयांमध्ये मिळून एकूण ५१२ विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले. एकूण ३८८९ विमुक्त व भटक्या जमातीच्या नव मतदारांची नोंदणी करण्यात आली. जिल्ह्यात एकूण एक लाख ८ हजार ३१७ मतदारांची नावे नमुना सात भरून वगळण्यात आली आहेत.

सर्व प्रकारचे मिळून ३ लक्ष ८१ हजार ५२२ अर्ज भरून घेण्यात आले व हे प्रमाण हे राज्यातून ४ थ्या क्रमांकावर आहे. नव मतदारांच्या मतदार नोंदणीबाबत राज्याचा जिल्हयाचा तिसरा क्रमांक आहे. ज्या मतदारांची नावे आज रोजीच्या मतदार यादीत समाविष्ट झाले नसतील त्यांनी आपली नोंदणी करून घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिका-यांनी केले आहे.

मतदार नोंदणीच्या उत्कृष्ट मतदार जागृती पुरस्कार २०२४ अंतर्गत नागपूर जिल्हाधिकारी, उपजिल्हा निवडणूक अधिकारी व मतदार नोंदणी अधिकारी, रामटेक विधानसभा मतदार संघ यांची राज्यस्तरीय पुरस्कारासाठी मुख्य निवडणूक अधिकारी यांचे कार्यालयाने निवड केली.

जिल्हाधिकारी कार्यालयात नेताजी सुभाषचंद्र बोस व बाळासाहेब ठाकरे यांची जयंती साजरी



हिंगोली ■ रुपेश एंगडे

नेताजी सुभाषचंद्र बोस व बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त येथील जिल्हाधिकारी कार्यालयात त्यांच्या प्रतिमेस अपर जिल्हाधिकारी खुशालसिंह परदेशी यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.

यावेळी उपजिल्हाधिकारी स्वप्नील मोरे, जिल्हा नियोजन अधिकारी सुधाकर जाधव, नायब तहसीलदार डी. एस. जोशी, जिल्हाधिकारी यांचे स्वीय सहायक नागेश बोलके यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालय व प्रशासकीय इमारतीमधील सर्व अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नरखेड येथे सुभाषचंद्र बोस यांची जयंती साजरी

नरखेड ■ अतुल दंढारे



देश गौरव नेताजी सुभाष चंद्र बोस यांची जयंती नरखेड भारतीय जनता पक्षातर्फे सिताराम चंद्र देवस्थान सभागृहात साजरी करण्यात आली याप्रसंगी नेताजीच्या प्रतिमेचे पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी काटोल नरखेड विधानसभा निवडणूक सहप्रमुख शामराव बारई होते नेताजीच्या जीवनावर सर्वश्री प्रमोद वघाळे सुरेश शेंद्रे,संजय कामडे शहराध्यक्ष राजेश क्षीरसागर सुनील बालपांडे गुणवंत गिरडकर संजय कामडे, प्रकाश सनेसर,यांनी मनोगत व्यक्त केले,कार्यक्रमाला कविता शेंद्रे, ?ड नलिनी धकीते, प्रमिला वानोडे,वामनराव बालपांडे,दीपक महाजन, सारंग दळवी, जुबेर शेख,धनराज खोडे,लीलाधर रेवतकर ,पुरुषोत्तम वैद्य,प्रशांत बालपांडे,संदीप मेतकर, अशोक काकडे,दीपक बेहरे, सुनील मोहोड, नितेश सोमकुवर,मुरलीधर वैद्य, अतुल भालेराव, गिरधर रेवतकर,वीरेंद्र खंडेलवाल,अशोक वैद्य,गुणवंत गिरडकर, संजय गुरमुले,रमेश दातिर,राजू कांबळे,रणजित गजबे,पंकज वैद्य,भूषन रेवतकर,शुभम वानखेडे मनीष अरखेल, व इतर पदाधिकारी उपस्थित होते कार्यक्रमाचे संचालन अशोक कलंबे यांनी केले.

सुमठाणा येथे श्री रामचंद्र प्रभू प्राणप्रतिष्ठा दिन उत्साहात साजरा

टाळ, विणा ,मृदंगाच्या गजरात मिरवणूक, कीर्तन आणि महाप्रसादाचा केल आयोजन

दै, जनप्रभात उपसंपादक लातूर जिल्हा ■ विष्णू मोहन पोले



लातूर/ अहमदपूरः तालुक्यातील सुमठाणा येथे श्री रामचंद्र प्रभू प्राणप्रतिष्ठा उत्सवाच्या निमित्ताने विविध धार्मिक उपक्रम राबवले. सविस्तर बातमी अशी की, २२ जानेवारी २०२४ हा दिवस भारत भर एखाद्या सणासारखा साजरा केला जात आहे. श्रीराम प्रभू यांच्या प्राणप्रतिष्ठेचा सोहळा अयोध्येमध्ये होत असला तरीही पूर्ण देशभरातील रामभक्तांनी आपल्या घरासमोर रांगोळी, देव्हाऱ्यावरती पूजन करून राम प्रभूच स्वागत केल आहे.याच राम भक्तीने मंत्र मुग्ध झालेलं अहमदपूर तालुक्यातील सुमठाणा हे गाव छोटसं असलं तरीही आपल्या कर्तृत्व आणि सामाजिक उपक्रमाने कायमच तालुक्यात केंद्रबिंदू ठरलेला आहे. सर्व गावकऱ्यांच्या वतीने हनुमान मंदिर साफसफाई करून श्रीराम प्रभूच्या प्रतिमेचे विधी वत पूजन करून त्यांच्या प्रतिमेची टाळ,विणा,मृदंग, अभंग ,जय श्री राम चे जय घोष करत मिरवणूक काढण्यात आली. गावातील प्रत्येक घरासमोर श्रीराम प्रभू यांच्या स्वागतासाठी रांगोळी काढण्यात आल्या होत्या, भजनी मंडळी ,महिला, युवक, पुरुष मंडळी सर्वच राम भक्त आपल्या प्रभू रामचंद्राच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त, आगमनानिमित्त अतिशय आनंदात दिसून येत होते. त्यानंतर ह भ प माणि क महाराज मोहगावकर यांच्या सुंदर वाणीतून श्रीराम चरित्र आणि प्रबोधन पर किर्तन झाले. सर्व गावकऱ्यांनी महाप्रसादाचा उत्तम आयोजन केलं होतं माता भगिनी, बाल, वृध्द, नवयुवक, या सर्वांमध्येच राम भक्तीचा आनंद संचारलेला दिसून येत होता पूर्ण दिवस जय श्रीराम चे नारे देऊन पूर्ण परिसर दुमदुमून निघाला होता.

पूर्णा शहरात श्रीराम जन्मोत्सव समितीच्या वतीने भव्य शोभायात्रा मिरवणूक



परभणी ■ अरविंद कांबळे

पूर्णा शहरातील सकल हिंदू समाजाचे श्रद्धास्थान पाचशे वर्षांनंतर श्रीराम जन्मभूमी आयोध्या येथील श्रीराम मंदिराच्या मूर्ती प्रतिष्ठान सोहळ्या निमित्त आज पूर्णा शहरात दक्षिण मंदिर आनंद नगर पूर्णा येथे राम मंदिर निर्माण साठी बलिदान देणाऱ्या भव्य सत्कार करण्यात आला. आरती करून शोभायात्रेची सुरुवात झाली. ढोल पथक भजनी मंडळ , हजारो तरुणी व महिला यांची लक्षणीय उपस्थित होते. हनुमान मूर्ती वानर सेना प्रभू श्री रामाची मूर्ती राम-लक्ष्मण सीता यांच्या सजीव देखाव्यासह असंख्य हिंदू समाज बांधव रस्त्यावर शोभायात्रेत दिसून आले. ही शोभायात्रा पूर्णा शहरातील अंबिका आनंदनगर चौक एसबीआय कॉर्नर, बस चौक शिवाजी चौक, सोनार गल्ली महादेव मंदिर, गवळी गल्ली ते श्रीराम मंदिर या मुख्य मार्गाने काढण्यात आली. या मिरवणुकीमध्ये भगवे झेंडे तसेच राम नावाचा जयघोष करीत निघाले. वारकरी संप्रदायातील छोट्या वारकऱ्यांनी लक्ष वेधले. या शोभायात्रेत प्रभू श्रीरामाच्या नावाच्या जयघोषाने पूर्णा शहर दुमदुमून गेले. या शोभायात्रा मिरवणुकीचे आयोजन श्रीराम जन्मोत्सव समिती पूर्णा वतीने करण्यात आले.

महाराष्ट्र राज्य पत्रकार महासंघाच्या शिरुर तालुका अध्यक्षपदी तेजस फडके तर उपाध्यक्षपदी सागर रोकडे



शिरुर (पुणे) ■ शकील मनियार

समाजात पत्रकार म्हणुन काम करत असताना आपली आर्थिक बाजु पहिली भक्कम असली पाहिजे. पत्रकार म्हणुन आपण जर आर्थिक हितसंबंध जोपासण्याचा प्रयत्न केला तर आपण लाचारी स्वीकारली असा त्याचा अर्थ होतो आणि जो माणुस लाचार असतो तो निर्भीड पत्रकारिता करुच शकत नाही असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य पत्रकार महासंघाचे महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष डॉ समीर राजे यांनी केले.

महाराष्ट्र राज्य पत्रकार महासंघाच्या शिरुर तालुका कार्यकारणीची बैठक नुकतीच रांजणगाव गणपती येथील हॉटेल संदीप येथे नुकतीच पार पडली. यावेळी डॉ समीर राजे बोलत होते. यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार महासंघाच्या शिरुर तालुका अध्यक्षपदी तेजस फडके, उपाध्यक्षपदी सागर रोकडे तर कार्याध्यक्षपदी प्रफुल्ल बोंबे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार महासंघाचे राज्याध्यक्ष डॉ समीर राजे, पुणे जिल्हाध्यक्ष सचिन धुमाळ, पुणे विभागीय सदस्य अरुणकुमार मोटे, साहेबराव लोखंडे, डॉ अश्विनकुमार लोढा तसेच उद्योजक संदीप कुटे, जनसेवक तुकाराम डफळ, मराठवाडा युवा अध्यक्ष धीरज कांबळे युवानेते रामेश्वर सांगुळे उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्य पत्रकार महासंघाची शिरुर तालुका कार्यकारणी पुढीलप्रमाणे अध्यक्षः- तेजस फडके (शिरुर तालुका डॉट कॉम / दै.प्रभात) उपाध्यक्षः- सागर रोकडे (दै. सकाळ) कार्याध्यक्षः- प्रफुल्ल बोंबे (दै. प्रभात) सचिवः- निलेश जगताप (जनता न्युज २४ तास) कोषाध्यक्षः- किरण पिंगळे-शेलार (शिरुर तालुका डॉट कॉम / दै. समर्थ भारत) संपर्कप्रमुखः- सुनिल जिते (दै. राष्ट्रसह्याद्री) सह संपर्कप्रमुखः- धनंजय साळवे (दै. समर्थ भारत) प्रसिद्धीप्रमुखः- अर्जुन शेळके (दै. लोकन्याय संघर्ष) कार्यकारी समिती अध्यक्षः- संपत कारकुड (शिरुर तालुका डॉट कॉम)

शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे यांचे शिक्षण क्षेत्रातील कार्य अद्वितीय - प्रा.डॉ.दीपक जाधव

सातारा ■ जीवन मोहिते



महाराष्ट्रामध्ये शिक्षण क्षेत्राचा प्रसार प्रामुख्याने पश्चिम महाराष्ट्रमध्ये झाला आहे. त्यात शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे यांचे कार्य अद्वितीय आहे.असे गौरवोद्गार जेष्ठ इतिहास अभ्यासक प्रा.डॉ.दीपक जाधव यांनी काढले.

येथील लाल बहादूर शास्त्री कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स अँण्ड कॉमर्स आयोजित श्री. स्वामी विवेकानंद जयंती सप्ताह निमित्त आयोजित व्याख्यानात डॉ.जाधव बोलत होते. अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ.आर. तवर होते.यावेळी प्रा.डॉ.सुनील साठे व प्रा.डॉ.बिरामणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रा.डॉ.जाधव पुढे म्हणाले, 'बऱ्याच लोकांना परंपरा असते. वारसा लाभलेला असतो. त्यामुळे ते मोठे कार्य करू शकतात. परंतु ज्यांना वारसा नाही. सामान्य परिस्थितीत जन्माला येऊन दुर्दम्य इच्छाशक्तीच्या जोरावर उत्तम कार्य करू शकतो.डॉ. बापूजी साळुंखे यांचा जन्म स्वातंत्र्यपूर्व काळात झाला असून त्यांच्या आई-वडील लहानपणीच मृत्यू झाल्यामुळे त्यांची परिस्थिती अत्यंत हलक्याची होती. तरीसुद्धा त्यांनी नोकरीच्या मागे न लागता अविरत शिक्षणाचा ध्यास घेऊन शिक्षण पूर्ण केले.सामाजिक क्षेत्र सुधारण्यासाठी महात्मा फुले, स्वामी विवेकानंद, कर्मवीर अण्णा ते डॉ.बापूजी साळुंखे यांची परंपरा दिसते. यामध्ये विशेषता रयत व स्वामी या दोन शिक्षण संस्था शिक्षण क्षेत्रातील परिवर्तनाचे मुख्य कारण मानले जाते.डॉ.बापूजी साळुंखे यांच्यावर प्रामुख्याने साधुसंत आणि म. गांधी यांच्या विचारांचा प्रभाव होता.त्यांनी सौंडुरचे सर्व राजवैभव सोडून स्वातंत्र्य चळवळीत सामील झाले. सातारा जिल्हा हा त्याकाळी क्रांतिकारकांचा म्हणून संबोधला जात होता.त्या वेळेस आपणाकडे पत्री सरकार होते. त्यामध्ये नाना पाटील,लाड,नागनाथ नायकवडी व आबासाहेब वीर ही सर्व मंडळी कार्य करत होती.दुसऱ्या बाजूला बापूजी चळवळीमध्ये स्वातंत्र्य सैनिकांना मदत करत होते. क्रांतिकार्यामध्ये बापूजींचा प्रमुख सहभाग असायचा. त्यांनी क्रांतिकारक म्हणून ही कार्य केले. बापूजींनी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था स्थापन केली.या संस्थेचा मुख्य उद्देश म्हणजे शिक्षण हे गरिबांच्या झोपडीपर्यंत गेले पाहिजे. ज्ञानगंगा घरोघरी गेली पाहिजे हा त्यामागचा उद्देश होता. हे त्यांचे कार्य अद्वितीय असे आहे.'

डॉ.अशोक तवर म्हणाले, 'ज्ञान,विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार करणारे शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे यांच्या शैक्षणिक कार्याचा वारसा आपण सर्वांनी जतन केला पाहिजे.त्यांचे शिक्षण क्षेत्राप्रमाणेच स्वातंत्र्य लढ्यामध्येसुद्धा कार्य महत्वपूर्ण होते.' प्रा.डॉ.वामन सरगर यांनी प्रास्ताविक केले.आग्नेश शिंदे यांनी आभार मानले.सदरच्या कार्यक्रमास वैभव सपकाळ, महाडिकसर आणि अध्ययनार्थी उपस्थित होते.

गोंदेगाव नगरी श्री राम पदयात्रा यात्रा काढत भगवीमय



दै, जनप्रभात छ.संभाजीनगर ग्रामीण प्रतिनिधी ■ प्रवीण वाघ

सोयगावः- अयोध्येतील प्रभू श्रीराम मंदिराच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त देशात सर्वत्र आनंद आणि उत्साहाचे वातावरण असतांना गोंदेगाव येथील ग्रामस्थांच्या पुढाकाराने भव्य श्री राम, श्री लक्ष्मुण,श्री सीता माता पदयात्रा यात्रा काढण्यात आली यानंतर आयोजन करण्यात आले

लहान बाळ गोपाळ यांनी श्री राम सीता लक्ष्मुण यांचे रुप घेतले होते व गोंदेगाव सर्व

आज संपूर्ण देश राममय झालेल आहे.प्रत्येक व्यक्ती मोठ्या आनंदाने अयोध्येतील प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचा साक्षीदार बनला आहे.याच पावन पर्वाचे औचित्य साधून गोंदेगाव वासियांनी भगवान श्री राम,सीता लक्ष्मुण यांची पदयात्रा काढली व त्यांचे स्वागत करण्यासाठी घरोघरी रांगोळी,गुढ्या,सडा,काढत भगवे पताका,लावत,ढोल,ताशा, फटाके,फोडत,भजन,कीर्तन, ओव्या म्हणत,गोंदेगाव नगरी श्री राम,जय जय श्री राम घोषणा देत श्रीराम मंदिर ते संपूर्ण गावात पद यात्रा काढून स्वगत करण्यात आले गोंदेगाव नगरी भगवीमय व श्री राम यांच्या घोषणांनी दुमदुमली होती ह्या यात्रेत गावातील तरूण,तरूणी,महिला मंडळ,गावातील जेष्ठ नागरिक,व शाळेतील विद्यार्थी यांनी ही स्टेजवर विविध सांस्कृतिक कार्यक्रमातून स्वागत केले ह्या वेळी जिल्हा परिषद शाळा गोंदेगाव श्री स.,भु,हायस्कूल, गोंदेगाव, श्री सुशिल मुरली हायस्कूल वनगाव यांनी ह्या शाळेतील विद्यार्थ्यांनी यांनी सहभाग घेतला होता व ह्या मुला, मुलींना गावातील नागरिकांनी बक्षीस ही दिले व नंतर अयोध्येतील श्रीराम यांच्या प्राण प्रतिष्ठा ६,७,७ द्वारे गावातील नागरिकांना लायू दाखवण्यात आली व गोंदेगावातील नागरीकांनी आनंदोत्सव साजरा केला.

बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त उसतोड महिलांना साड्यांचे वाटप शिवसेना वडवणी तालुका प्रमुख युवराज गोंडे यांचा उपक्रम

बीड ■ गितांजली लव्हाळे



हिंदुहृदय सम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त वडवणी तालुका शिवसेना मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे गटाचे तालुकाप्रमुख युवराज गोंडे यांच्या वतीने काल मंगळवार रोजी तालुक्यातील चिंचोटी येथील ऊसतोड मजुरांच्या उसाच्या फडात जाऊन ऊसतोड महिलांना साड्यांचे वाटप करून सामाजिक उपक्रम राबवून जयंती साजरी करण्यात आली.

हिंदुरुदय सम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांची काल दिनांक २३ जानेवारी रोजी जयंती विविध सामाजिक उपक्रम राबवून वडवणी तालुका शिवसेनेच्या वतीने साजरी करण्यात आली यामध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटाचे शिवसेनेचे तालुकाप्रमुख युवराज गुंडे यांच्या वतीने वडवणी तालुक्यामध्ये विविध सामाजिक उपक्रम राबवून जयंती साजरी करण्यात आली यामध्ये वडवणी शहरात परिषद कार्यालयामध्ये बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करून जयंती साजरी करण्यात आली तसेच चिंचोटी येथे उसाच्या फडात जाऊन ऊस तोड कामगार महिलांना मोफत साड्या वाटप करून सामाजिक उपक्रम राबवून जयंती साजरी करण्यात आली यावेळी शिवसेना तालुका प्रमुख युवराज गोंडे, उपतालुकाप्रमुख प्रताप मात्रे, युवासेना तालुका प्रमुख दिनेश जाधव, चिंचोटी सरपंच भागवत गोंडे, ओमराजे जाधव शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष बीड जिल्हा प्रमुख, निष्ठावंत शिवसैनिक हनुमंत शिंदे, दादासाहेब गोंडे उपसरपंच, यादव गोंडे, मुकुंद गोंडे, समाधान गोबरे, कृष्णा गोंडे,यासह शिवसैनिक, व उसतोड मजुर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राम लल्लाच्या प्राणप्रतिष्ठा सोहळा निमित्त विविध संघटनेच्या वतीने महाप्रसादाचे वाटप



दै, जनप्रभात मराठवाडा उपसंपादक ■ **राठोड रामेश पांडित**

लातूरः सोमवार दि. २२ जानेवारी रोजी वसंतराव नाईक चौक येथील आयोध्येतील राम ललाच्या प्राण प्रतिष्ठे निमित्त लातूर येथे अखिल भारतीय आदिवासी वाल्मिकी संघटना,मार्तंड सेना,

श्रीमती सुंदरादेवी, बहुउद्देशीय सेवा.संस्था (उद्द) अंन्टी करप्शन अन्ड मिडीया इन्व्हेस्टीगेशन,

महाराष्ट्र पोलीस असो अखिल भारतीय सेना अशा विविध संघटनेच्या वतीने महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.यावेळी विशाल भाऊ सूर्यवंशी, नंदू दुधाळे,विष्णू चामटकर,रामभाऊ देवके पंडित जाधव उत्तम चव्हाण अनिल कनापे , पत्रकार,कृष्णा कोल्हापुरे, संजय गायकवाड,बालाजी साळूंके साळूंके टी हाऊस, पत्रकार मारोती माने,पत्रकार संजय उदारे मधुकर हुगे,राजासाब शेख,आकाश कोटलवार, सुनिल वस्ताद, आदित्य साळूंके, पि.सु.फुलसरे,विजय गरड वैभव जाधव शुभम होळकर ओमकार साळूंके आदिंची उपस्थिती होती.

सिताबाई थिटे फार्मसी महाविद्यालय राज्यस्तरीय आदर्श शाळा पुरस्काराने सन्मानित

शिरुर (पुणे) ■ शकील मनियार



श्री छत्रपती संभाजी शिक्षण संस्थेच्या सिताबाई थिटे कॉलेज ऑफ फार्मसी (पॉली.), शिरूर या महाविद्यालयास स्पर्श सेवाभावी संस्था अहमदनगर यांच्यावतीने राज्यस्तरीय आदर्श शाळा पुरस्कार२०२४ देण्यात आला.

सदर पुरस्कार हा महाविद्यालयाने ग्रामीण भागात केलेल्या उल्लेखनीय शैक्षणिक कार्याचा गौरव म्हणून देण्यात आला. १९९५ सालापासून सिताबाई थिटे कॉलेज ऑफ डी. फार्मसी कार्यक्षम फार्मासिस्ट घडविण्याचे कार्य करत असून जवळपास १७०० विद्यार्थी किरकोळ/घाऊक औषध विक्रेते, शासकीय फार्मसीस, औद्योगिक क्षेत्र तसेच परदेशात देखील फार्मासिस्ट म्हणून कार्यरत आहेत. महाविद्यालयाची २०००० स्क्वेअर फुट स्वतंत्र इमारत असून यामध्ये वर्गखोली,प्रयोगशाळा, ग्रंथालय, संगणक कक्ष, सेमिनार हॉल इ. सुविधा उपलब्ध असून अनुभवी व तज्ञ शिक्षकांची नेमणूक करण्यात आलेली आहे. महाविद्यालयाचा निकाल नेहमीच ९०इ पेक्षा जास्त आहे. २००४ मध्ये महाविद्यालयातील विद्यार्थिनी कु जंगम संपदा हिने एम. एस. बी. टी. ई. मुंबई मार्फत घेण्यात येणाऱ्या परीक्षेमध्ये राज्यात द्वितीय क्रमांक पटकाविला होता.

महाविद्यालयीन शिक्षणाबरोबरच विविध उपक्रमातून विद्यार्थ्यांचे संभाषण कौशल्य, नेतृत्व गुण, वेळेचे नियोजन, सर्जनशीलता इ. गुण विकसित होण्यासाठी महाविद्यालय नेहमीच प्रयत्नशील असते.

पुरस्कार वितरण सोहळा शनिवार दिनांक २० जानेवारी २०२४ रोजी ऑर्किड प्रि-स्कूल क्रीडांगण, नागरदेवळे, भिंगार ता. जि.-अहमदनगर येथे पार पडला.

सदर पुरस्कार ज्येष्ठ समाजसेविका सौ. ममताताई सिंधुताई सपकाळ यांच्या हस्ते देण्यात आला. पुरस्कार स्विकारण्यासाठी महाविद्यालयाच्या वतीने डॉ. द्वारकादास बाहेती सर, श्री. विशाल कारखिले सर, सौ हेमांगी झिंजुर्के मॅडम, सौ शुभांगिनी केदारी मॅडम आदी उपस्थित होते.

सदर पुरस्कारामुळे महाविद्यालयाची प्रतिमा उंचावली असून आणखी नव्या जोमाने कार्य करण्याची ऊर्जा सर्व शिक्षकांना मिळाली आहे. तसेच सौ. सुप्रियाताई साबळे मंडलिक मॅडम (माजी विद्यार्थिनी डी.फार्मसी.) आणि सर्व विद्यार्थी, हितचिंतक यांनी दाखवलेल्या विश्वासामुळेच महाविद्यालयास आज हा पुरस्कार प्राप्त झाला असे मत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अमोल शहा सर यांनी व्यक्त केले.

पुरस्कार प्राप्ती बद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ.राजेंद्र थिटे साहेब, सचिव श्री धनंजय थिटे साहेब, संचालक डॉ. हर्षवर्धन थिटे साहेब तसेच सर्व पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

'मराठा आरक्षणासाठी आहुती देतोय'; छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात तरुणाने संपवले जीवन

दै, जनप्रभात छ.संभाजीनगर जिल्हा प्रतिनिधी ■ मोहन आखाडे



फुलंब्री तालुक्यातील वारेगाव येथे सोमवारी सकाळी मराठा समाजाच्या आरक्षण समर्थनात आणखी एका तरुणाने बळी दिला. ज्ञानेश्वर शिवाजी मोहारे (२४) असे मृत तरुणाचे नाव आहे. 'मी मराठा आरक्षणासाठी आहुती देत आहे, माझा जरांगे पाटील यांना पाठींबा', अशी चिठी त्याच्याजवळ आढळून आली.

ज्ञानेश्वर शिवाजी मोहारे वय २४ असे आत्महत्या करणाऱ्या तरुणाचे नाव असून त्यांनी सोमवारी सकाळी ९ वाजेच्या दरम्यान शेतातील गट १७१ मधील लिंबाच्या झाडाला दोरी लावून गळफास घेतला. ही घटना सकाळी दहा वाजता उघडकीस आली. त्याच्या चुलत भावाने नातेवाईक आणि पोलिसांना याबाबत माहिती दिली. यावरून फुलंब्री पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक श्रीनिवास धुळे,जमादार संतोष डोंगरे यांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला. मृतदेह छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात रवाना करण्यात आला.

आत्महत्या केलेल्या ठिकाणी त्याच्या खिशात चिट्ठी आढळून आली. ती पोलिसांनी ताब्यात घेतली. 'मी मराठा आरक्षणासाठी आहुती देत आहे, माझा जरांगे पाटील यांना पाठींबा! एक मराठा लाख मराठा' असा मजकूर आढळून आला. ज्ञानेश्वर हा खाजगी वाहनावर चालक म्हणून काम करत असे. त्याचे वडील शिवाजी मोहारे यांना दोन एकर शेती असून उदरनिर्वाहसाठी ते मजुरी करतात.

फुलंब्रीचे तहसीलदार कृष्णा कानगुले यांच्या सुचनेनुसार नायब तहसीलदार संजीव राउत, तलाठी स्नेहा जोनवाल यांनी घाटी रुग्णालयात जाऊन मृताच्या वारसास शासकीय मदतीच्या दृष्टीने प्रक्रिया पार पाडली. फुलंब्री तालुक्यात मराठा आरक्षण समर्थनात आतापर्यंत धामणगाव, चिंचोली नकीब, खामगावसह वारेगाव येथील ४ तरुणांनी आत्महत्या केलेली आहे.

छ. श्रीमंत प्रतापसिंह नगरवाचनालयात प्रथमच दिनदर्शिकेचे प्रकाशन



सातारा ■ जीवन मोहिते

येथील छ. श्रीमंत प्रतापसिंह महाराज (थोरले) यांच्या जयंतीनिमित्त नगरवाचनालयातर्फे प्रथमच दिनदर्शिकेचे प्रकाशन शानदारपणे मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

प्रथमतः छ.प्रतापसिंह महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यावेळी ग्रंथप्रदर्शनाचा शुभारंभ सुनील शेडगे व ज्येष्ठ रंगकर्मी कल्याण राक्षे यांच्या हस्ते करण्यात आले. अधक्षस्थानी नगरवाचनालयाचे अध्यक्ष अजित कुबेर होते.यावेळी विश्वस्त अनंत जोशी, ज्योत्स्ना कोल्हटकर आदींची प्रमुख उपस्थिती होती.

प्रतापसिंह महाराज यांचे विविध क्षेत्रांतील योगदान दिशादर्शक असल्याचे शेडगे यांनी सांगितले. नगरवाचनालय हे सातारा नगरीचे वैभव आहे. येथील उपक्रम हे वाचकांना दिशा देणारे असल्याचे राक्षे यांनी सांगितले.डॉ. राजेंद्र माने यांनी ग्रंथ प्रदर्शनामागची भूमिका प्रास्ताविकेत स्पष्ट केली. वैदेही कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले. प्रदीप कांबळे यांनी आभार व्यक्त केले.सदरच्या कार्यक्रमास डॉ.श्याम बडवे, प्रकाश शिंदे, प्रा.श्रीधर साळुंखे, विशाल देशपांडे, कवी श्रीनिवास वारुंजीकर,आनंद ननावरे,उपेंद्र गरगटे,अनिल वीर, ग्रंथपाल रूपाली मुळे,तसेच वाचनालयाचे कर्मचारी, सभासद उपस्थित होते. कार्यक्रमात प्रदीप कांबळे यांची अमळनेर साहित्य संमेलनात निमंत्रित कवी म्हणून निवड झाल्याबद्दल व ज्योत्स्ना कोल्हटकर यांचा अश्वमेध ग्रंथालयाचा उत्कृष्ट कार्यकर्ता पुरस्कार मिळाल्याने गौरव करण्यात आला.

वंदनीय हिंदुरुदय सम्राट शिवसेनाप्रमुख श्री बाळासाहेब ठाकरे यांना ९८ व्या जयंती निमितताने राजूर येथे अभिवादन!



दै, जनप्रभात मराठवाडा उपसंपादक ■ राठोड रामेश पांडित

राजूर (अहमदपूर) - येथील शिवनेरी कार्यालय थोडगा रोड येथे वंदनीय शिवसेनाप्रमुख श्री बाळासाहेब ठाकरे साहेब यांना जयंती निमित्त महाराष्ट्र रिक्षा चालक सेना शाखा राजुर यांच्या वतीने अभिवादन करण्यात आले यावेळी महाराष्ट्र रिक्षा चालक सेनेचे तालुका प्रमुख तथा उप शहर प्रमुख शिवकुमार बेद्रे नितीन मस्के , बाळू बार्शीकर, बंटी शिंदे, सोनू हिवरे, सोपान हाके, नागेश गोडबोले, अजय तिदोळे, संदीप करले, अंगत उमाटे, महाराष्ट्र रिक्षा चालक सेनेचे सर्व रिक्षा चालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लातूर जिल्ह्याचे लोकप्रिय खासदार ज्यांच्या संकल्पनेतून राजूर येथे राम मंदिर स्थापना संपन्न



दै, जनप्रभात मराठवाडा उपसंपादक ■ राठोड रामेश पांडित

अहमदपूर:- अहमदपूर येथे न भूतो न भविष्यती असा राम दरबार कार्यक्रम पार पडला यांनी सहपरिवार आज सायंकाळी श्री साई गणेश मिल्ट्री फाउंडेशन, रुद्धा पाटी, अहमदपूर येथे सदिच्छा भेट दिली असता माजी सभापती सौ. अयोध्याकाकू अशोकराव केंद्रे,श्री अनिरुद्ध काका केंद्रे,मा. सरपंच अनुसयाताई केंद्रे डॉ.जयप्रकाश केंद्रे, प्रा. हरगिले सर, श्री माणिक केंद्रे सर, श्री निवृत्ती केंद्रे सर, विशालजी कांबळे व श्री साई गणेश परिवारातर्फे छोटेखाणी सत्कार करण्यात आला यावेळी माजी नगरसेवक डॉ.सिद्धार्थजी सूर्यवंशी, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष श्री गोविंदजी गिरी उपस्थित होते.

रेल्वे स्थानकावर नियमांचे उल्लंघन करणाऱ्या प्रवाशावर दंडात्मक कारवाई



परभणी ■ अरविंद कांबळे

रेल्वे स्थानकावर वेगवेगळ्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या प्रवाशांकडून रेल्वे प्रशासनाने दंड वसुली मोहीम सुरू केली असून यामध्ये जवळपास अडीच लाख रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे यासाठी रेल्वे स्थानकावर कोर्टाचा विशेष कॅम्प देखील घेण्यात आला ज्यामध्ये २४० केसेस निकाली काढण्यात आल्या रेल्वे स्थानकावर नियमबाह्य पद्धतीने रेल्वे ओलांडताना विना तिकीट आलेल्या प्रवाशांच्या विरोधामध्ये या कारवाया करण्यात आले आहेत आणि त्यामुळे प्रवाशांमध्ये खळबळ उडाली आहे.

श्री गुरु बुद्धी स्वामी महाविद्यालय पूर्णा येथे नेताजी सुभाष चंद्र बोस आणि हिंदुरुदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांची जयंती साजरी



परभणी ■ अरविंद कांबळे

पूर्णा जंक्शन श्री गुरु बुद्धी स्वामी महाविद्यालय पूर्णा येथे नेताजी सुभाष चंद्र बोस आणि हिंदू सम्राट बाळासाहेब ठाकरे यांची जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रम प्रसंगी नेताजी सुभाष चंद्र बोस यांचे स्वातंत्र्य चळवळीतील योगदान या विषयावर डॉ पी वाय गंगासागर यांनी मार्गदर्शन केले. तसेच बाळासाहेब ठाकरे यांच्या कार्याचा परिचय डॉ ओंकार चिंचोले यांनी करून दिला. याप्रसंगी प्राचार्य डॉ के राजकुमार च्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. कार्यक्रमासाठी उपप्राचार्य डॉ शिवसांब कापसे, व गजानन कुरुंदकर, डॉ,अजय कुर्हे,डॉ सोमनाथ गुंजकर प्रा उमाशंकर मिटकरी, प्रा आबाजी खराटे, कार्यालयीन अधीक्षक बी पी कुलकर्णी, पांचाळ ,श्री गिरीष शिवणकर,श्री संजय कापुरे , यासह मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

जिल्हा हिंदी अध्यापक मंडळावर आप्पासाहेब भंडारे यांची नियुक्ती



सातारा ■ जीवन मोहिते

जिल्हा हिंदी अध्यापक मंडळाच्या कार्यकरिणीमध्ये सदस्य म्हणून श्रीमंत छत्रपती प्रतापसिंहराजे भोसले विद्यालय ढोरोशी, ता. पाटण येथिल हिंदी शिक्षक आप्पासाहेब मारुती भंडारे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

राष्ट्रभाषा भवन येथे अध्यक्ष ता. का. सूर्यवंशी यांच्या हस्ते भंडारे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी उपाध्यक्ष शाहनवाज मुजावर,पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य,भवन सचिव लावंडसर, जिल्हा वनाधिकारी अभिजीत माने आदी हिंदीप्रेमी उपस्थित होते.याबद्धल अनेक मान्यवरांनी भंडारे यांचे अभिनंदन केले आहे.

मागास आयोगाचा सर्व्हे निःपक्षपातीपणे करा. वडवणीचे तहसिलदार यांना निवेदन



बीड ■ गितांजली लव्हाळे

दि.२३/१/२०२४ रोजी राज्य मागास आयोगाच्या वतीने खुल्या समाजाचा सामाजिक ,आर्थिक परिस्थिती तपासण्यासाठी सर्वेक्षण होणार असून हे निःपक्षपातीपणे करण्याची मागणी वडवणी तालुक्यातील ओबीसी समाजाच्या शिष्टमंडळाने आज मा.तहसिलदार मंदे साहेब यांना निवेदन देऊन मागणी करण्यात आली. यावेळी मा.तहसिलदार साहेब यांनी आश्वासन दिले की,वडवणी तालुक्यातील सर्व्हे हा कोणाच्याही दबावाला बळी न पडता सर्व सर्व्हे होणार असून असून ओबीसी बांधवानी निश्चिंतपणे राहावे कोणीही काळजी करू नये. असे आश्वासन दिले या शिष्टमंडळामध्ये ओबीसी नेते प्रा.वैजेंनाथ शिंदे,विठ्ठल भुजबळ,लक्षमण भाऊ भंडारे, दत्ता टिपरे ग्रामपंचायत सदस्य विठ्ठल बहिरे,,सिद्धेश्वर भुजबळ, संजय बोत्रे,विठ्ठल खरपे ,गोरख बागडे,शिव टिकुळे ए.खेत्री ,निरंजन गडले,याच्यासह आदींची उपस्थिती होती.

वसमत शहरातील स्थलांतरित शेळी बाजारामुळे ट्रॅफिक जाम तर सुविधा नसतानाही कर वसुली

हिंगोली ■ रुपेश एंगडे



हिंगोली जिल्ह्यातील वसमत शहरात भरणारा शेळी बाजार हा स्थलांतरित केल्यामुळे शेळी खरेदी - विक्री करणाऱ्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे . ज्या ठिकाणी हा शेळी बाजार भरवला जातो त्या ठिकाणी कोणतीही स्वच्छता पाहायला मिळत नाही तर साधे पाणी पिण्यासाठी देखील उपलब्ध नाही. वसमत नगर परिषदेकडून त्या ठिकाणी कोणतेही सुविधा उपलब्ध नसतांना देखील या ठिकाणी प्रत्येक शेळी मागे वीस रुपयांचा कर वसूल केला जातो हे मात्र नगरपरिषदेकडून जाक्तीच होत असल्याचे दिसत आहे . एवढेच नाही तर सदरचा शेळी बाजार हा राष्ट्रीय महामार्ग लगत असल्यामुळे मोठ्या प्रमाणात ट्राफिक जाम होताना दिसत आहे. यातून अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही म्हणून सदरचा बाजार हा राष्ट्रीय महामार्गापासून दूर आणि सोयी सुविधासह स्वच्छ ठिकाणी शेळी बाजार भरवला जावा अशी शेळी खरेदी - विक्री करणारासह जनतेची देखील इच्छा आहे. याकडे प्रशासन यंत्रणा लक्ष घालून बाजाराच्या दिवशी होणारा ट्राफिकचा प्रश्न मिटवून , शेळी - खरेदी विक्री करणाऱ्यांची होणारी गैरसोय दूर करणार का ? याकडे सर्व जनतेचे लक्ष लागले आहे.

श्रीराम प्राणप्रतिष्ठापना सोहळा जांबूत येथे मोठ्या उत्साहात साजरा अयोध्येतील राममंदिर उद्घाटनानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन

शिरुर (पुणे) ■ शकील मनियार



अयोध्येत येत्या २२ जानेवारी ला श्री रामलल्ला ची प्रतिष्ठापना होती. त्यानिमित्त जांबुत (ता . शिरूर) येथे तीन दिवस विविध धार्मिक कार्यक्रमआयोजित करण्यात आले होते .समस्त ग्रामस्थ जांबुत च्या वतीने श्री रामलल्ला प्राणप्रतिष्ठापणा सोहळ्यानिमित् कीर्तन महोत्सव आयोजित करण्यात आले होते.

जांबुत गावातील मंदिरात शनिवार (दि. २०)रोजी .ह .भ .प. स्वामीराज महाराज भिसे (बारामती) यांचे कीर्तन झाले. रविवार(दि . २१) रोजी सायं. ह.भ.प . जयेश महाराज भाग्यवंत (श्री मलंगगड, डोंबिवली) सोमवार (दि. २२) रोजी स. १० ते १२ वाजता ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज कदम (आळंदी) यांचे काल्याचे कीर्तन झाले व त्यानंतर महाप्रसाद वाटप करण्यात आला. जांबुत गावात सकाळी १० वाजता. या वेळेत श्री रामलल्ला ची भव्य मिरवणूक काढण्यात आली.

या प्रसंगी ग्रामपंचायत सदस्य राहुल रावसाहेब जगताप, ग्रामपंचायत सदस्य गोरक्ष गजानन गाजरे,उमेश राऊत,पोपट फिरोदिया,युवराज पळसकर ,सुभाष कोरडे,रामकृष्ण ढूमणे,अमोल शेलार,पंढरीनाथ गाजरे, व आदी मान्यवर उपस्थित होते .

या कार्यक्रमाचा सर्व भाविकांनी व ग्रामस्थांनी लाभ घेतला. या कार्यक्रमासाठी अनेक नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते.

जनप्रभात हे दैनिक पत्र मालक, प्रकाशक,मुद्रक : संपादक राहुल ज्ञानेश्वरराव गजरे यांनी रुतुजा प्रिंटर,नवीन आष्टी ता.आष्टी जि.वर्धा ४४२२०२ येथे मुद्रीत करुन साप्ताहिक जनप्रभात कार्यालय,नवीन आष्टी ता.आष्टी जि.वर्धा ४४२२०२ येथे प्रसिध्द केले. भ्रमणध्वनी ७८७५६१३६१९ (या पत्रकातील सर्व माहितीशी संपादक,मालक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद वर्धा न्यायालयांतर्गत) RNI NO : MAHMAR/2022/82242